
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. २९ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ११७ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संसदेत ऑपरेशन सिंदूरवर वादळी चर्चा

नवी दिल्ली : अखेर एका आठवड्याच्या गदारोळानंतर संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आज 'ऑपरेशन सिंदूर' आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर चर्चेला दणक्यात सुरुवात झाली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लोकसभेत चर्चेला सुरुवात करत, भारतीय लष्कराच्या शौर्याचे कौतुक केले आणि या कारवाईत १०० हून अधिक दहशतवादी व त्यांचे सूत्रधार मारले गेल्याची माहिती दिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ऑपरेशन सिंदूर संदर्भात आज संसदेत महत्त्वाची माहिती दिली. विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून अनेकदा ऑपरेशन सिंदूर संदर्भात चर्चेची मागणी करण्यात आली. संसदेच विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी झाली. आज सकाळी संसेदत मोठा गदारोळ पहायला मिळाला. त्यामुळे सुरुवातीला कामकाज तहकूब करावं लागलं. दुपारनंतर राजनाथ सिंह यांनी ऑपरेशन सिंदूर संदर्भात प्रश्नांची उत्तर दिली. राजनाथ सिंह म्हणाले की, कुठल्याही देशात जनता सत्ताधारी आणि विरोधी पक्षाला वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपवते. सत्ताधाऱ्यांच काम असतं जनतेच हित ध्यानात ठेऊन काम करणं आणि विरोधी पक्षांच काम असतं सरकारला जनतेशी संबंधित मुद्दे, प्रश्न विचारणं

### ट्रम्प यांचा दावा फेटाळला

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीच्या दाव्यालाही राजनाथ सिंह यांनी फेटाळून लावले. 'ऑपरेशन सिंदूर' थांबवण्यासाठी भारतावर कोणताही आंतरराष्ट्रीय दबाव नव्हता, असे त्यांनी नमूद केले.



### राजनाथ सिंहांचे लोकसभेत निवेदन

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय सशस्त्र दलांच्या पराक्रमाचे कौतुक करत पाकिस्तानलाही खडे बोल सुनावले. प्रत्युत्तराची कारवाई: पहलगाम हल्ल्यानंतर लगेचच आपल्या सशस्त्र दलांनी कारवाई केली. दहशतवाद्यांच्या नऊ ठिकाणांवर (इन्फ्रास्ट्रक्चर साईट्स) अचूक हल्ले चढवण्यात आले, ज्यात १०० हून अधिक दहशतवादी, त्यांचे प्रशिक्षक आणि सूत्रधार (हँडलर्स) लक्ष्य ठरले, असे राजनाथ सिंह यांनी सांगितले.

अशातच देश की सेना शेर है, अशा शब्दात सिंह यांनी लष्कराचे कौतूकसुद्धा केले. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीचा दावाही त्यांनी फेटाळला.

आज सुद्धा मी माहिती देतोय. ऑपरेशन सिंदूर का सुरु केलं? याची माहिती याआधी सुद्धा दिली आहे. कधी कधी विरोधी पक्षाचे लोक विचारतात की, त्यांनी किती विमानं पाडली? मला असं वाटतं की, त्यांचा हा प्रश्न राष्ट्रीय जनभावनेच प्रतिनिधीत्व करत नाही. त्यांनी एकदाही असं विचारलं नाही की, आपल्या सैन्याने शत्रूची किती विमानं पाडली. त्यांना प्रश्न विचारायचा असेल, तर त्यांनी विचारावं की, भारताने दहशतवादी धुळीस मिळवले का? तर त्याचं उत्तर हो आहे असं राजनाथ सिंह म्हणाले.

बहिणींच सिंदूर मिटवलं, त्यांचं काय झालं?

मी विरोधी पक्षाच्या सन्मानित सदस्यांना सांगू इच्छितो की, ऑपरेशन सिंदूर यशस्वी झालं का? त्याचं उत्तर हो आहे. तुम्हाला जर प्रश्न विचारायचा असेल, तर त्यांनी प्रश्न विचारावा की, ज्या दहशतवाद्यांनी बहिणींच सिंदूर मिटवलं, त्यांचं काय झालं? ऑपरेशन सिंदूरमध्ये आम्ही त्या दहशतवाद्यांच्या लीडरनाच संपवलं असं राजनाथ सिंह म्हणाले. प्रश्न विचारायचाच असेल, तर ऑपरेशन सिंदूरमध्ये शूर सैनिकांच काही नुकसान झालं का? त्या बद्दल विचारावं, याच उत्तर आहे नाही, भारतीय सैनिकांच नुकसान झालेलं नाही. लक्ष्य मोठं असेल, तेव्हा छोट्या गोष्टींकडे लक्ष नाही गेलं पाहिजे असं राजनाथ सिंह म्हणाले.

# भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर देशव्यापी तोडगा काढण्याची गरज - सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत सहा वर्षीय मुलीचा रेबीजमुळे मृत्यू झाल्यानंतर भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल (सूमोटो) घेतली आहे. 'ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आणि अस्वस्थ करणारी' असल्याचे नमूद करत, न्यायालयाने या समस्येवर देशव्यापी तोडगा काढण्याची गरज व्यक्त केली आहे.

दिल्लीतील पूठ कलान परिसरात ३० जून रोजी पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात छवी शर्मा या ६ वर्षीय चिमुकलीला गंभीर इजा झाली होती. उपचारानंतरही रेबीजच्या संसर्गामुळे २६ जुलै रोजी तिचा मृत्यू झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने एका इंग्रजी वृत्तपत्रातील बातमीची दखल घेतली आणि ती स्वतःहून दाखल याचिका मानली.

न्यायालयाने नमूद केले की, शहरावर भटक्या कुत्र्यांचे संकट आणि त्याची किंमत मोजणारी मुले या मथळ्याखाली प्रसिद्ध बातमी अत्यंत त्रासदायक आहे. शहरी आणि निमशहरी भागांतील कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे अनेकांना रेबीजचा संसर्ग होतो असून, लहान मुले आणि वृद्ध यांचे प्राण जात आहेत.

या प्रकरणाची नोंदणी स्वतःहून दाखल केलेली रिट याचिका म्हणून करण्याचे निर्देश देत, खंडपीठाने हे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सरन्यायाधीश भूषण आर. गवई यांच्या समोर ठेवण्यास सांगितले आहे.

यापूर्वी १५ जुलै रोजी, दुसऱ्या एका खंडपीठाने नोएडामध्ये भटक्या कुत्र्यांना खाद्य देण्यासाठी निश्चित जागा ठरवण्याच्या मागणीवर सुनावणी घेतली होती. त्यावेळी न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी सायकलस्वार, दुचाकीस्वार आणि मॉर्निंग वॉक करणाऱ्यांना भटक्या कुत्र्यांकडून होणाऱ्या धोक्याची गंभीर नोंद घेतली होती. प्राण्यांसाठी जागा आहे, पण माणसांसाठी नाही, अशा शब्दांत त्यांनी चिंता व्यक्त केली होती. भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनासाठी केंद्र सरकारने २०२३ मध्ये प्राणी जन्म नियंत्रण (एबीसी) नियम लागू केला आहे. या अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था आणि रहिवासी कल्याण संघटनांवर कुत्र्यांना अन्नपुरवठा आणि नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी आहे.

## श्रीनगरमध्ये चकमक, ३ दहशतवादी ठार

श्रीनगर : जम्मू काश्मीरमध्ये श्रीनगर येथे सुरक्षा पथकांनी ऑपरेशन महादेव राबवले. या ऑपरेशन अंतर्गत सुरक्षा पथकांनी ३ दहशतवाद्यांना ठार केले. गुप्त माहितीच्या आधारे सुरक्षा पथकांनी कारवाई केली. श्रीनगरमधील दाचीगाम राष्ट्रीय उद्यानाजवळील हरवान भागात चकमक झाली. या चकमकीत ३ दहशतवादी ठार झाले. ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये मुसा सुलेमानी आहे. हा मुसा सुलेमानी आधी पाकिस्तानच्या सैन्यात कार्यरत होता. भारतीय सैन्याच्या चिनार कॉर्प्सने 'एक्स' अर्थात ट्विटरवर चकमकीची माहिती दिली आहे. तीव्र गोळीबारानंतर तीन दहशतवाद्यांना ठार केले आहे. चकमक अद्याप सुरू आहे; असे चिनार कॉर्प्सने 'एक्स' अर्थात ट्विटरवर जाहीर केले. स्थानिक पोलीस ठाण्यानेही चकमकीच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. दोन वेळा गोळीबाराचा आवाज ऐकू आला. त्यानंतर अधिक कुमक पाठवण्यात आली. दहशतवाद्यांना मारण्यासाठी शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आली; असे पोलिसांनी सांगितले.



# दिव्या देशमुख भारताचा अभिमान - मुख्यमंत्री

मुंबई, २८ जुलै : महिला बुद्धिबळ विश्वचषकावर नाव कोरून ग्रँण्ड मास्टर दिव्या देशमुख यांनी भारताची मान गौरवाने उंचावली आहे. विशेषतः महाराष्ट्राची पहिली ग्रँण्ड मास्टर.. विश्वविजेती म्हणून महाराष्ट्राचे नाव बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय पटावरही सुवर्णाक्षरांनी नोंदवले आहे. या कामगिरीसाठी तमाम महाराष्ट्राच्या वतीने दिव्या देशमुख यांचे मनःपूर्वक अभिनंदन, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला बुद्धिबळ विश्वचषक विजेत्या दिव्या देशमुख यांचे अभिनंदन केले आहे. तसेच त्यांनी उपविजेत्या ग्रँण्ड मास्टर कोनेरू हम्पी यांचेही अभिनंदन केले आहे.



बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय पटावरील या दोन्ही भारतीय खेळाडूंच्या चालींकडे अवघ्या बुद्धिबळ जगताची नजर खिळली होती, हा देखील भारतीय बुद्धिबळ क्षेत्रासाठी अपूर्व आणि अभिमानास्पद योग असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस शुभेच्छा संदेशात म्हणतात, महिला विश्वचषक स्पर्धेत दुसऱ्याच प्रयत्नात दिव्या यांनी भारतीय विक्रम नोंदवला आहे. महिला कॅन्डिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरणाऱ्या पहिल्या किशोरवयीन बुद्धिबळपटू ठरल्या आहेत. यासोबतच आता त्या भारताची चौथ्या महिला ग्रँडमास्टर ठरल्या आहेत. आतापर्यंत त्यांनी आंतरराष्ट्रीयस्तरावर ४० वेळा भारताचे प्रतिनिधीत्व करत, ३५ वेळा पदक पटकाविले आहे. यात तब्बल २३ सुवर्ण, ७ रौप्य आणि ५ ब्राँन्झ पदकांचा समावेश आहे. बुद्धिबळाच्या विश्वविजेते पदासाठी दोन भारतीय बुद्धिबळपटूंची लक्षवेधी झुंज जगासाठीही उत्कंठावर्धक ठरली, हे देखील विशेष मानावे लागेल. बुद्धिबळासारख्या खेळात भारतीय महिला खेळाडूंनी घेतलेली झेप महत्वाचीच अशी आहे. दिव्या आणि कोनेरू यांच्या पटावरील चाली या तोडीस तोड होत्या. या दोघींनीही आपल्या खेळीने इतिहास रचला आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणूनच एकत्रितच लढवायच्या - मुख्यमंत्री

वर्धा, २८ जुलै - येणाऱ्या पाच वर्षात महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलून टाकू. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणूनच आपण एकत्रितच लढवत आहोत. अर्थातच ज्याठिकाणी काही अडचणी आहेत, तिथे आमच्याशी चर्चा करुन निर्णय घ्यायचे आहेत. ज्याठिकाणी महायुतीमध्ये निवडणूक होणार नाहीत, त्याठिकाणी आपल्या मित्रपक्षावर टीका करायची नाही. कारण आपण जर सत्तेत एकत्र आहोत. त्यामुळे आपल्याला मैत्रीपूर्ण लढती करायच्या आहेत. आपल्याला या निवडणुकीत भाजपचे निर्विवाद वर्चस्व दाखवायचे आहे, असे निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वर्ध्याच्या सेवाग्राम येथील चरखा गृहात आज भाजपची विदर्भ स्तरीय आढावा बैठक पार पडली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंथन करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः या बैठकीला उपस्थित आहेत. सोबतच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह १९ जिल्ह्यांतील जिल्हाध्यक्षांसह ७५० पदाधिकारी या बैठकीला हजर होते.

# मराठी तरुणांसाठी राज्य सरकार ॲप आधारित रिक्षा, टॅक्सी व ई-बाईक सेवा सुरु करणार

मुंबई : राज्यातील मराठी मिळावा यासाठी आता राज्य सरकार रोजगारासाठी नवीन संधी उपलब्ध करून देणार आहे .

राज्य सरकार ॲप आधारित प्रवासी वाहनसेवा सुरू करण्याच्या विचारात असुन प्रवासी वाहतुकीसाठी ॲप आधारित रिक्षा,टॅक्सी व ई-बाईक सेवा आता खासगी कंपन्यांपुरती मर्यादित न राहता, परिवहन विभागाच्या सहकार्याने सुरू करण्यात येणाऱ्या या प ला जय महाराष्ट्र, महा - राईड, महा-यात्री, महा-गो यापैकी एखादे नाव देणार असल्याचे प्रस्तावित आहे.

याबद्दलची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. अर्थात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या अंतिम मान्यतेने सदर शासकीय प लवकरच कार्यान्वित होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे .

मंत्री सरनाईक म्हणाले की, या उपक्रमाअंतर्गत ॲप विकसित करण्यासाठी 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्ट टेक्नॉलॉजी' आणि 'मित्र' या संस्थेसह खासगी कंपन्यांशी चर्चा सुरू करण्यात आली आहे. यंत्रणेत



पारदर्शकता ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा समावेश यात असून लवकरच ॲप तयार होणार आहे.

या माध्यमातून मराठी तरुण- तरुणींना विशेष आर्थिक पाठबळ देण्यात येणार आहे. बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार देण्यासाठी मुंबई बँकेच्या माध्यमातून वाहन खरेदीसाठी १० टक्के व्याजदराने कर्ज दिले जाणार आहे. अशी ग्वाही मुंबै बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी दिली. ते म्हणाले की, मुंबै बँकेच्या मदतीने बेरोजगार तरुण -तरुणींना अर्थसहाय उपलब्ध करून देण्यात येईल . तसेच अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ, भटके विमुक्त महामंडळ, ओबीसी महामंडळ आणि एमएसडीसी या संस्थांतर्फे ११ टक्के व्याज परतावा अनुदानाच्या स्वरूपात दिला जाणार आहे. त्यामुळे हे कर्ज बिनव्याजी असल्यासारखे आहे.

मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, केंद्र सरकारच्या ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्वानुसार या प ची नियमावली अंतिम टप्प्यात आहे. सध्या खाजगी संस्था अनाधिकृत प च्या माध्यमातून प्रचंड नफा कमवतात. त्यासाठी त्या कंपन्या चालक व प्रवासी यांची लूट करीत आहेत. सरकारकडे यंत्रणा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ मुबलक प्रमाणात असल्यामुळे शासनाने असे प विकसित केल्यास त्याचा फायदा प्रवाशांच्या बरोबर चालकांना देखील होईल. या संदर्भात ५ ऑगस्ट रोजी मंत्रालयात संबंधितांची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर या प निर्मितीचे तंत्रज्ञ व शासकीय अधिकारी उपस्थित असतील, त्यामुळे या बैठकीत या शासकीय पला अंतिम स्वरूप देण्यात येणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

## भारताविरुद्धच्या पाचव्या कसोटीसाठी इंग्लंड संघाची घोषणा, या ऑलराऊंडरची पुन्हा झाली एंट्री

लंडन: भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. यातील चार सामने झाले आहेत. आता दोन्ही संघादरम्यानचा पाचवा आणि शेवटचा कसोटी सामना लंडनच्या ओव्हल मैदानावर खेळवला जाणार आहे.

या पाचव्या कसोटीसाठी इंग्लंडने आपल्या संघाची घोषणा केली आहे. वेगवान गोलंदाज जेमी ओव्हरटनचा इंग्लंडच्या कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे. चौथ्या कसोटीसाठी त्याला संघातून वगळण्यात आले होते, जिथे तो सरेसाठी काउंटी सामना खेळण्यासाठी गेला होता. आता तो पुन्हा संघात परतला आहे.

जेमी ओव्हरटन एक वेगवान गोलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू म्हणून ओळखला जातो. तो या मालिकेत पहिल्या तीन कसोटी सामन्यांसाठी इंग्लंडच्या संघाचा भाग होता. मँचेस्टर कसोटीतून त्याला सरेसाठी काउंटी सामना खेळण्यासाठी सोडण्यात आले होते आणि आता त्याला पुन्हा इंग्लंडच्या संघात सामील करण्यात आले आहे.

जेमी ओव्हरटनची रेकॉर्ड्स:

कसोटी सामने: जेमी ओव्हरटनने आतापर्यंत १ कसोटी सामना खेळला आहे, ज्यात त्याने २ बळी घेतले आहेत आणि ९७ धावा केल्या आहेत.

प्रथम श्रेणी क्रिकेट: प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याने ९८ सामने खेळले आहेत. यामध्ये त्याने ३१.२३ च्या सरासरीने २३७ बळी घेतले आहेत आणि २१.८२ च्या सरासरीने २४०१ धावा केल्या आहेत.

त्याच्या या समावेशामुळे इंग्लंडचा वेगवान गोलंदाजीचा पर्याय मजबूत होण्याची शक्यता आहे. पाचवा कसोटी सामना लंडनच्या ओव्हल मैदानावर होणार आहे.






सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हर हर महादेव च्या घोषात औंढ्यात भाविकांची दर्शनासाठी गर्दी

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते नागनाथाची महापूजा





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

औंढा नागनाथ येथील बारापैकी आठवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू नागनाथांच्या दर्शनासाठी श्रावणातल्या पहिल्या सोमवारी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. रविवारी मध्यरात्रीपासूनच भाविक येथे दाखल होऊ लागले होते. हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता सपत्नीक व कळमनुरी विधानसभा शिवसेनेचे आमदार संतोष बांगर व गोदावरी बांगर यांनी प्रभू नागनाथाची सपत्नीक महापूजा केली व दुग्धाभिषेक केला. यावेळी पद्माक्ष पाठक, तुळजादास भोपी, जीवन ऋषी, नारायण भोपी, आबागुरू बल्लाळ, गौरव पुराणिक, कल्याण पुराणिक यांनी महापूजेची आवर्तने म्हटली. मध्यरात्रीनंतर दोनला मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले झाले. मराठवाड्यासह विदर्भ व राज्याच्या अन्य भाविकांनी दर्शन घेतले. अनेक भाविक अनवाणी मंदिरात दाखल झाले होते. दिंड्या, कावड यात्राही आल्या होत्या. 'हरहर महादेव', 'बम बम भोले', 'नागनाथ महाराज की जय'च्या जयघोषाने मंदिर परिसर दिवसभर दुमदुमून गेला. नागनाथ देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे, नायब तहसीलदार प्रवीण ऋषी,देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, मंदीर गार्डप्रमुख बबन सोनुने व सदस्य दिवसभर मंदिरात होते. पोलिस निरीक्षक जी. एस. राहिरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बंदोबस्त ठेवला होता. महापूजेनंतर मध्यरात्रीनंतर दोनच्या सुमारास भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले.पोलीस प्रशासनाने नागनाथ मंदिरामध्ये कडक बंदोबस्त ठेवला होता. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी मंदिरातील बंदोबस्ताचा आढावा घेऊन मंदिर परिसराची पाहणी केली.

# आखाडा बाळापूर बाजार समिती मविआ एकत्र लढविणार

## बाजार समितीची पुन:रचना होईपर्यंत स्थगीती द्यावी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

जिल्ह्यातील आखाडा बाळापूर येथील बाजार समिती एकत्र लढविण्याचा निर्धार महाविकास आघाडीने घेतला असून यासंदर्भात माजी खा ॲड शिवाजीराव माने यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सोमवार दि २८ रोजी बैठक पार पडली.

आखाडा बाळापूर ही बाजार समिती जिल्ह्यातील महत्वाची बाजार समिती म्हणून ओळखली जाते. या बाजार समितीवर १८ जागांसाठी निवडणुक होणार आहे. यामध्ये ग्रामपंचायत गटातून ११, व्यापारी गटातून २ तर हमाल मापाडी गटातून एक जागेसाठी निवडणुक होणार आहे. सध्या या बाजार समितीवर शिंदे सेनेचे वर्चस्व आहे. कळमनुरी तालुक्यातील मोठ्या गावंचा या बाजार समितीमध्ये समावेश आहे. तर डोंगरकडा व बोल्डा या उपबाजारपेठ आहेत. या बाजार समितीवर वर्चस्व मिळविण्यासाठी महाविकास आघाडीने कंबर कसली आहे. माजी खा ॲड शिवाजीराव माने यांच्या फार्म हाऊसवर माजी आ. डॉ संतोष टारफे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू पाटील, माजी जि प उपाध्यक्ष मनिष आखरे, डी के दुर्गे, नागोराव करंडे, बालाजी बोंढारे, डॉ संतोष बोंढारे, भागवत चव्हाण गोयंका यांच्यासह महत्वाचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी बाजार समितीवर महाविकास आघाडीचाच झेंडा फडकविण्याचा निर्धार या बैठकीत घेण्यात आला. मात्र कोणत्या गटातील जागा कोणला सुटणार हे अद्याप स्पष्ट झाले नसून लवकरच याबाबत निर्णय होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

यासंदर्भात महाविकास आघाडीने जिल्हा उपनिबंधक यांना निवेदन सादर केले असून कृषी उत्पन्न बाजार समिती आखाडा बाळापूरच्या कार्यक्षेत्रात हिंगोली व औंढा नागनाथ तालुक्यातील गावांचा समावेश केलेला असून शासनाच्या तालुकानिहाय पुन:रचनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या विरोधात आहे. त्यामुळे ही निवडणुक बाजार समितीची तालुकानिहाय पुन:रचना होईपर्यंत स्थगीत करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# मसापच्यावीने भरपावसात कवी संमेलनाचे आयोजन



**तभा वृत्तसवा**
**हिंगोली, २८ जुलै**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा हिंगोली तर्फे कै. रं रा. बियाणी नुतन साहित्य मंदिर वाचनालयामधील नरहर कुरुंदकर सभागृहामध्ये कविता श्रावण सरीच्या हा कविसंमेलचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. म.सा.प.च्या हिंगोली शाखेतर्फे महिन्याच्या चौथ्या शनिवारी हा कार्यक्रम नियमितपणे आयोजित केला जातो. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी म.सा.प.शाखेचे अध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक अशोक अर्धापुरकर हे होते.

या बहारदार कार्यक्रमात नऊ ते दहा कवींनी सहभाग नोंदविला. गोडाती काळे यांनी प्रास्ताविक केले तर कवी राजकुमार मारग, विजय गुडकर, महारूद्र घणकर, कु तेजस्विनी मोरगे, गोडाती काळे, सुमन दुबे, रतन आडे आदी कवींनी बहारदार कविता सादर केल्या. बरसत्या पावसात हे कवी संमेलन रंगले. नवोदित कविंसाठी नवे काहीतरी करण्याचा प्रयत्न मराठवाडा साहित्य परिषदेच्यावतीने होत असतो असे विचार जेष्ठ कादंबरीकार अशोक अर्धापुरकर यांनी व्यक्त केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नूतन साहित्य मंदिर वाचनालयाचे ग्रंथपाल संतोष ससे, लक्ष्मणराव यांनी विशेष प्रयत्न केले रतन आडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि श्रावण सरीचा हा कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.



**हिंगोली– येथील रेल्वे स्थानकावरील दादऱ्याचे काम सुरू असून सध्या प्रवाशांना एका प्लॅटफार्मवरून दुसऱ्या प्लॅटफार्मवर जाण्यासाठी रेल्वे स्थानकावरील रेल्वे पटरी ओलांडून जीव धोक्यात घालून जावे लागत आहे. यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी होत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राम नागरेंना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार




हिंगोली– वंजारी समाज सेवा प्रतिष्ठान तथा राष्ट्रीय जयंती उत्सव समिती महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने शिवसेनेचे नेते राम नागरे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला असून दि २९ जुलै रोजी नाशिक येथील लक्ष्मीजी मंगल कार्यालय तपोवन येथे त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. बहुजन समाजाच्या कल्याणकारी योजना त्यांनी त्यांच्या विभागात प्रभावीपणे राबविल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून राम नागरे यांचे अभिनंदन होत आहे.

### जलेश्वर मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी



हिंगोली– शहरातील प्राचीन जलेश्वर मंदिरात पहिल्या सोमवारी भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात बेल, फुले तसेच इतर पूजेचे साहीत्य विक्रीसाठी आले होते. महिला, पुरूष तसेच तरूण–तरूणी यांनी येथील प्राचीन जलेश्वर मंदिरात महादेवाच्या पिंडीवर बेल वाहून दर्शन घेतले. यावेळी महाआरती आणि महापूजा करण्यात आली. हर हर महादेव च्या जयघोषात भाविकांनी दर्शन घेतले.

### कार्तिक भेंडेकर याचा सत्कार



हिंगोली– श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान यांच्या वतीने खंडाळा येथील रहिवाशी कार्तिक भेंडेकर यांनी नीट परीक्षेत भारतातून सर्वसाधारण गटातून १११२ तर ओबीसी गटातून ३६९ रँक प्राप्त केलेला आहे. या विषयाबद्दल कार्तिक भेंडेकर व त्याचे आई वडील यांचा सत्कार करण्यात आला.

# पत्रकारांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, कार्यशाळेत जिल्हाधिकारी गुप्ता यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

पत्रकारांनी कृत्रिम बुद्धिमत्ते (एआय)ने विकसित केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पत्रकारिता करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत असलेल्या जिल्हा माहिती कार्यालयामार्फत येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात पत्रकारांसाठी एकदिवशीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी राम कैलाश मीना, जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, प्रा. दीपक रंगारी, तुकाराम झाडे, नंदकिशोर तोष्णीवाल उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील मुद्रित माध्यमे, ईलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमांत काम करणाऱ्या पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रसार माध्यमात काम करताना दैनंदिन कमकाजात जास्तीत जास्त वापर करता येईल, याविषयी प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात चँट जीपीटीच्या माध्यमातून आपल्याला हव्या त्या विषयाची माहिती टंकलिखित करताक्षणी काही सेकंदात उपलब्ध होते, आणखी काही शिक्षण विभागातील मुलांसाठी अभ्यासक्रमातील चाचणी परीक्षा घेण्यासाठी प्रश्न पत्रिकेचा मजकूर टाकल्यास प्रश्न आणि त्याचे उत्तरही सहज मिळते, त्यामुळे या चँट जीपीटीचा वापर करून सविस्तर माहिती मिळविता येते. मात्र आपल्याला काय हवे याची माहिती असणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित मार्गदर्शन कार्यशाळेत जिल्हा सूचना अधिकारी राम मीना यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याबाबत मार्गदर्शन करताना सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली.

प्रा. दीपक रंगारी यांनी वृत्तसंकलन–संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन करताना मराठी प्रमाणभाषेच्या शुद्धलेखनाचे नियम, शब्दाचा अर्थ, भाषेतील व्याकरणाचा वापर याबरोबरच मराठी भाषा समृद्ध करण्यात विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. वाक्यामध्ये येणारी क्रियापदे, शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व, दीर्घ, ईकारांत याबरोबरच एकाक्षरी क्रियापद, शब्दयोगी अव्यय, तत्सम आणि तद्भव शब्दांविषयीचे स्पष्टीकरण उदाहरणासह समजावून सांगितले. शब्दकोश आणि लेखनकोश याचा वापर करून पत्रकाराचे निर्दोष लिखाण कसे असावे, याविषयी मार्गदर्शन केले.

जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते यांनी पत्रकारांसाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या अधिस्वीकृती पत्रिका, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी, उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार आदी विविध योजनांची माहिती दिली.

यावेळी पत्रकार नंदकिशोर तोष्णीवाल, संतोष भिसे यांनी पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन करुन चांगल्या प्रकारची माहिती दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रद्युम्न गिरीकर यांनी केले, तर आभार चंद्रकांत कारभारी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रकांत कारभारी, श्रीकांत देशमुख, गंगा देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

# माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा रुग्णालय येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे फळ वाटपाचा आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. तसेच बाळासाहेब ठाकरे नगर एनटीसी येथे श्री महाबली हनुमान मंदिरास साऊंड सिस्टिम देण्यात आली आणि परिसरात वृक्षारोपण व महाआरती करण्यात आली

या कार्यक्रमास जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू सावंत पाटील, मराठवाडा संघटक शेतकरी सेना वासिम भाई, उद्धवराव गायकवाड उप जिल्हाप्रमुख, गणेशराव शिंदे उपिल्हाप्रमूख प्रशासक, परमेश्वर राव माडगे विधानसभा प्रमुख हिंगोली, भानुदासराव जाधव तालुकाप्रमुख, आनंदराव जगताप तालुकाप्रमुख, विठ्ठलराव चौतमल जिल्हा प्रवक्ता, गोविंदराव मुटकुळे सर्कल प्रमुख, संदीप तनपुरे सर्कल प्रमुख, विनोद पाटील, चंदू उबाळे, रवी कुमार पप्पालू, सिताराम माने, कृष्णा बांगर, विनायक लिंबोरे, दत्तराव वाबळे, सुरेश गायकवाड, शिवाजीराव कराळे सर्कल प्रमुख,सुनील सावंत ,रुपेश सूर्यवंशी यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# औंढा नगर पंचायतीतील सफाई कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जुलै**

औंढा नागनाथ नगरपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत कालीन सफाई कर्मचारी व पाणीपुरवठा कर्मचारी हे विविध मागण्यांसाठी नगरपंचायत कार्यालयासमोर सोमवार दि २८ रोजी कामबंद आंदोलन व बेमुदत उपोषणास बसले आहेत.

नगरपंचायत सफाई कर्मचारी व पाणीपुरवठा कर्मचारी यांनी वेळोवेळी नगरपंचायत प्रशासन, तहसील प्रशासन, जिल्हाधिकारी प्रशासन यांना वेळोवेळी लेखी निवेदन घेऊनही त्यांच्या मागणी पूर्ण झाल्या नसल्याने त्यांनी अखेर कामबंद आंदोलन व बेमुदत उपोषणाचा पवित्रा घेतला आहे. त्यांच्या मागण्या १३ महिन्यापासून प्रलंबित असलेले वेतन अदा करणे, शासनाच्या नियमाप्रमाणे किमान वेतनात वाढ करणे, सफाई कर्मचारी व पाणीपुरवठा कर्मचारी यांच्या वारसांना कामावर घेणे, नगरपंचायत मार्फत सफाई कर्मचारी व पाणीपुरवठा कर्मचारी व इतर कर्मचारी यांना अपघात विमा लागू करणे या मागण्यांसाठी कामबंद आंदोलन व बेमुदत उपोषणास कर्मचारी यांनी सुरुवात केली आहे. गणपत रणखांबे, मधुकर मुळे, भिकाजी राठोड, रमेश थोरात, मुंजाजी रणखांबे, पंडित रणखांबे नागनाथ वाव्हूळे, गयाबाई रणखांबे लताबाई रणखांबे, धुरपताबाई सोनवणे, कांताबाई रणखांबे राजाबाई रणखांबे, छायाबाई रणखांबे आदी उपोषणाला बसले आहेत.

## श्रावण च्या पहिल्या सोमवारी लाखो भाविकांनी घेतले घृष्णेश्वराचे दर्शन



खुलताबाद प्रतिनिधी वेरूळ येथील बारावे, ज्योतिर्लिंग म्हणून घृष्णेश्वर हे देवस्थान भारतभरात प्रसिद्ध असून या ठिकाणी रविवारी सायंकाळपासूनच अनेक भाविक भक्तांच्या कावड यात्रा दिंड्या सह भाविक भक्तांनी वेरूळ परिसर गजबजून गेला होता मंदिर संस्थांच्या वतीने येणाऱ्या भाविकांसाठी दर्शन रांगेसाठी शेड ब्रॅकेट मधूनच चोक व्यवस्था केली होती महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे संस्थांच्या वतीने अभिषेक व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद असल्याने, दर्शनासाठी होणारा विलंब घंटो गिनती दर्शन रांगेत ताटकळत राहणाऱ्या भाविकांना मंदिर गाभाऱ्यात दर्शनाचा आनंद चांगल्या प्रकारे घेता येत असल्या ची चर्चा भाविक भक्तामध्ये होतानी दिसून येत होती भाविकांचे दर्शन सुरळीत होण्यासाठी घृष्णेश्वर मंदिर ट्रस्ट अध्यक्ष, कुणाल दांडगे व प्रमुख विश्वस्त यांच्या देखरेखी खाली सेक्युरिटी गार्ड मोठ्या प्रमाणात व्यवस्था करण्यात आली होती या ठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तासाठी काही दानशूर भक्तांनी बिसलरी पाणी साबुदाणा खिचडी ची व्यवस्था मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती वेरूळ घृष्णेश्वर मंदिर परिसरात कुठलाही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी खुलताबाद पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी चोक बंदोबस्त ठेवला होता.

## सार्वजनिक गणेश व दुर्गा उत्सव मंडळांना कायमस्वरूपी नोंदणी करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. २८ – सार्वजनिक गणेशोत्सव व दुर्गा उत्सव साजरे करणाऱ्या सर्व मंडळांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत कलम ४१(क) नुसार दरवर्षी वर्गणी संकलनासाठी परवानगी घेण्याऐवजी कायमस्वरूपी नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन धर्मादाय सह आयुक्त रा.स. पावसकर यांनी केले आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने मंडळांकडून वर्गणी संकलनासाठी परवानगी मिळवण्यासाठी अर्ज करण्यात येतो. मात्र, जर मंडळांनी संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणी केली असेल, तर त्यांना वारंवार परवानगी घेण्याची गरज भासणार नाही.तरी सर्व सार्वजनिक उत्सव मंडळांनी आपली नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन धर्मादाय सह आयुक्त यांनी केले आहे.

## पहा 'हाय पापा'चा प्रीमियर या मंगळवारी झी सिनेमावर!

या जुलैमध्ये झी सिनेमा घेऊन येत आहे 'हाय पापा'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर – एक हृदयाला भिडणारी कहाणी, जी प्रेम, कुटुंब आणि दुसऱ्या संधीची सुंदर मांडणी करते. अत्यंत प्रिय आणि सहज शैलीत अभिनय करणारे नानी आणि सुंदर मृणाल ठाकूर यांनी साकारलेली ही फिल्म एका वडिल आणि मुलीच्या नात्यातील संघर्ष आणि विजयाच्या शोधाच्या कथेसह प्रेक्षकांना भावनिक प्रवासावर घेऊन जाते . त्यामुळे हा प्रीमियर चुकवू नका – मंगळवार, २९ जुलै दुपारी १२ वाजता, फक्त झी सिनेमावर.

## आता औषधांवर ६0% पर्यंत बचत करू शकतात.

नाशिक – एक मोठा भार आहेत. हा ताण कमी करण्यासाठी, मुंबई आणि पुण्यातील विश्वसनीय फार्मसी चेन, झेनो हेल्थने नाशिकमध्ये नवीन मेडिकल स्टोर्स सुरू केले आहेत. पुढील १२ ते १८ महिन्यांत, झेनो हेल्थ नाशिकमध्ये एकूण ३० स्टोर्स उघडून आपली उपस्थिती आणखी मजबूत करण्याची योजना आखत आहे. या विस्तारामुळे, नाशिककरांना आता ६०% पर्यंत बचत करून, उच्च दर्जाची अस्सल औषधे उपलब्ध होतील.मुंबई आणि पुण्यात ३० लाखांहून अधिक ग्राहकांचा विश्वास मिळवलेली झेनो हेल्थने आतापर्यंत लोकांना औषधांवर १,००० कोटींहून अधिक बचत करून दिली आहे. आता नाशिक हे झेनोच्या या वाढत्या ग्राहकांच्या नेटवर्कचा नवा भाग बनले आहे, जिथे लोकांना आता परवडणारी किंमत आणि दर्जा यापैकी एकाची निवड करावी लागणार नाही – दोन्ही एकाच ठिकाणी उपलब्ध असतील. झेनो हेल्थ औषधे टॉप दर्जाच्या उत्पादकांकडून मिळवते आणि ती थेट ग्राहकांना पोहोचवते, ज्यामुळे मध्यस्थांची गरजच राहत नाही. ही सुव्यवस्थित सप्लाय चेनमुळे, उच्च-गुणवत्तेची औषधे ग्राहकांना किफायतशीर दरात मिळू शकतात.

## सादर केला दुसरा गीत 'सजना मेरा', अनोखा संगम

रॉयल स्टॅग बूमबॉक्स युनीव्हर्सल म्युझिक ग्रुपच्या सहकार्याने पुन्हा एकदा नव्या अंदाजात प्रेक्षकांसमोर आले आहे. मेलडी आणि हिप-हॉपचा अनोखा संगम सादर करणाऱ्या रॉयल स्टॅग बूमबॉक्स ओरिजिनल्सच्या माध्यमातून ब्रँडने आपला नवीन म्युझिक लाईनअप सादर केला आहे. 'पहले जैसी बात नहीं', 'हूडी', 'मोहब्बत' आणि 'इम्तिहान' यांसारख्या हिट गाण्यांनंतर आता या सिझनमधील दुसरे ओरिजिनल ट्रॅक 'सजना मेरा' लाँच करण्यात आले आहे. नीती मोहन, पँथर आणि रावेटर यांचा जबरदस्त कोलॅबरेशन असलेले हे गाणे मेलोडी आणि हिप-हॉपचा हटके अनुभव देणारे ठरत आहे. गेल्या तीन वर्षांत देशभरातील युवांना थेट कार्यक्रमांद्वारे ऊर्जा आणि उत्साहाने जोडणाऱ्या रॉयल स्टॅग बूमबॉक्सने आता 'बूमबॉक्स ओरिजिनल्स'च्या दुसऱ्या सिझनसह पुनरागमन केले आहे. हे गाण्यांचे सिरीज केवळ संगीत नसून ब्रँडच्या 'लिव्हिंग इट लार्ज' या स्पिरीटचे सादरीकरण आहे. संगीताच्या जगात नव्या शैली, नव्या आवाज आणि विविध संस्कृती यांचा संगम घडवत रॉयल स्टॅग बूमबॉक्स भारतीय संगीतविश्वाला एक वेगळा आयाम देत आहे आणि 'द ओरिजिनल साउंड ऑफ जनरेशन लार्ज' तयार करत आहे.

# कन्नड ग्रामीण रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची वानवा; रुग्णांचे जीव धोक्यात

## प्रसूतिंसाठी महिलांची धावपळ, अपघातग्रस्तांसाठी तातडीची शस्त्रक्रिया अशक्य, प्रशासनाचे दुर्लक्ष

तभा वृत्तसेवा-सहयोग प्र.जावळे

कन्नड :- दि. २८ जुलै – आरोग्य सुविधा ग्रामीण भागात पोहोचवण्यासाठी शासन शेकडो योजना राबवत असले तरी प्रत्यक्षात रुग्णालयांच्या कामकाजाची स्थिती चिंताजनक आहे. कन्नड तालुक्याच्या ग्रामीण रुग्णालयात सध्या तज्ज्ञ डॉक्टरांची वानवा गंभीर बनली असून केवळ प्राथमिक तपासणीपुरते उपचार इथं मिळत आहेत. स्त्रीरोगतज्ज्ञ, भुलतज्ज्ञ, हाडांचे तज्ज्ञ आणि अस्तिरोग तज्ज्ञ अशी सगळी महत्त्वाची पदं रिक्त असून या अभावामुळे रुग्णांची अक्षरशः धावपळ सुरू आहे.

कन्नड ग्रामीण रुग्णालयात सध्या एकूण ७ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. त्यापैकी दोन करार पद्धतीने नेमले गेले असून, त्यातील एक अधिकारी मागील तीन महिन्यांपासून पिशोर येथे कार्यरत आहे. उरलेल्या सहा डॉक्टरांपैकी एक वैद्यकीय अधीक्षक आहे, तीन डॉक्टर अपघात कक्षासाठी नियुक्त आहेत आणि फक्त दोन डॉक्टर रुग्णालयाच्या इतर सेवेवर काम करत आहेत.

विशेष म्हणजे, या डॉक्टरांपैकी तीन एमबीबीएस पदवीधारक आहेत, मात्र त्यांच्याकडे कोणतीही तज्ज्ञ पदवी नाही. यामुळे शस्त्रक्रिया, प्रसूती, गंभीर वैद्यकीय स्थिती यांसाठी आवश्यक निर्णय, प्रक्रिया व उपचार करता येत नाहीत. डॉक्टर असूनही उपचार मिळत नाही अशी विचित्र स्थिती रुग्णालयात निर्माण झाली आहे.

इथे स्त्रीरोगतज्ज्ञ नसल्यामुळे गर्भवती महिलांना प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावं लागतं. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना याचा फटका अधिक बसतो. सरकारी रुग्णालय असूनही खासगी दवाखान्यात हजारोंचा खर्च करावा लागतो हे दुर्दैव. स्थानिक नागरीक, कार्यकर्ते, वेळोवेळी या रिक्त पदांबाबत प्रश्न उपस्थित केले. अनेक वेळा प्रशासनाला लेखी निवेदनही देण्यात आलं. मात्र, अद्याप ना भरती झाली, ना पदे मंजूर झाली. आरोग्य विभागाकडून केवळ वेळकाढूपणा आणि आश्वासनं सुरू आहेत.

काही कार्यकर्त्यांनी इशारा दिला आहे की, जर तात्काळ तज्ज्ञांची भरती झाली नाही, तर रुग्णांच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल.

### बालरोगतज्ज्ञ अधिक, पण गरज कमी

या रुग्णालयात एक नाही तर दोन बालरोगतज्ज्ञ कार्यरत आहेत. मात्र, येथे लहान मुलांच्या रुग्णसंख्येचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे या पदांची प्रत्यक्ष गरज कमी असूनही त्या जागा भरून तज्ज्ञांची गरज असलेल्या इतर शाखा मात्र पूर्ण रिक्त आहेत. तिथे जे आवश्यक आहेत ते नाहीत, आणि जे आहेत त्यांची गरजच नाही – अशा व्यवस्थेचे विदारक चित्र येथे दिसते.



### अपघाताचे प्रमाण अधिक - तरीही भुलतज्ज्ञ, सर्जन नाहीत!

कन्नड तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग जात असल्यामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अशा अपघातांमध्ये रुग्णाच्या जीव वाचवण्यासाठी तात्काळ शस्त्रक्रिया, हाडे जुळवण्याचे उपचार, अथवा अंतर्गत रक्तस्राव थांबवण्याची गरज असते. पण येथे ना भुलतज्ज्ञ आहेत, ना जनरल सर्जन, ना हाडांचे तज्ज्ञ – परिणामी, रुग्णाला तात्काळ औरंगाबाद किंवा इतरत्र हलवावे लागते. या हालचालीदरम्यान गोल्डन अवर वाया जातो आणि अनेक वेळा रुग्ण गमावले जातात.

# पोरगाव मध्ये जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ

बिडकीन दि २६ जुलै आमदार विलास भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली भारत सरकार ग्रामीण विकास मंत्रालय भूसंपादन विभाग नवी दिल्ली आणि मृद व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने पैठण तालुक्यातील पोरगाव येथे जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ पैठण तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी विकास पाटील यांच्या हस्ते पार पडला वाटर शेड जनभागीदारी कप- २०२५ मध्ये पोरगाव आणि कारकीन ही गावे सहभागी झाली आहेत. यात



लोकसहभागातून जलतारा प्रकल्प पोरगाव मध्ये मध्ये राबविण्यात येत असुन त्याचा शुभारंभ आज करण्यात आला.तसेच कारकीन मध्ये जलतारासह सिमेंट नाला बांध मधून गाळ काढण्यात येणार असल्याची माहिती ग्रामीण विकास संस्था चे अध्यक्ष अशोक हुड यांनी दिली.जलतारा प्रकल्पाची वैशिष्ट्ये यात ज्या ठिकाणी पाणी साचते त्या ठिकाणी चार बाय चार आकाराचा आणि सहा फूट खोलीचा खड्डा घेऊन तो मोठे दगड वाळू खडी यांनी भरून घेतला जातो. एक जल तारा प्रकल्पाचा खड्डा जवळपास पूर्ण पावसाळ्यात दीड लाख लिटर पाणी जमिनीत मुरविण्याचे काम करतो . या द्वारे भुजल पातळी झपाट्याने वाढते .

या प्रकल्पाच्या शुभारंभवेळी ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष अशोक हूड पोरगाव ग्रामपंचायतचे सरपंच संगीता प्रभाकर निळ, सारथी संस्थेचे सतीष वासुंदेकर कारकीनच्या सरपंच भारतीताई रणजीत नवले आडुळ मंडळाधिकारी अशोक पठाडे, पोरगावचे कृषी सहाय्यक दत्ता भवर, राजू कोळगे, पाडळी चे माजी उपसरपंच सरदार , सुभाष नीळ, भरत गायकवाड, लक्ष्मण शिंदे, सोमीनाथ सुखरूपे, चेअरमन मच्छिंद्र निळ, शंकर निळ, गणेश, सर्जेराव गायकवाड, रमेश निळ, ऋषिकेश हुड, आदित्य हुड, सी एस आर बॉक्स चे हर्ष फापळ यांची उपस्थिती होती.

## टाझानियातील मुलगा घेतोय आर्य चाणक्य शाळेत शिक्षण



पैठण दि २८ :- पैठण मधील नामांकित आर्य चाणक्य विद्या मंदिर या शाळेत मातृभाषेतून (मराठीतून)टाझानिया येथील मुलगा शिक्षण घेत आहे.

एकीकडे वाढते इंग्रजी माध्यमांचे फॅड असतांनादेखील परदेशी विद्यार्थी आर्य चाणक्य शाळेमध्ये प्रवेश घेतला आहे . टांझानिया येथील रूद्र सोपान निकम हा मुलगा इयत्ता तिसरी मध्ये शिकत आहे. त्याचे आई-वडील टांझानिया येथे काही वर्षे नोकरीला होते. आपल्या मराठी मातृभाषेमध्ये आपला पाल्य शिक्षण घावे असे त्यांनी ठरवले. त्यासाठी आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर ही शाळा निवडली आहे . टांझानिया येथे इयत्ता दुसरी मध्ये शिकणारा हा विद्यार्थी व त्याचे आई-वडील परदेशी राहुन देखील आपल्या मुलाने मातृभाषेत मध्येच शिक्षण घ्यावे म्हणून ठरवलेले होते शाळेचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, वर्ग शिक्षक प्रमोद काकडे, व इतर शिक्षक त्याला मराठीचे धडे देत आहेत. आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर ही फक्त शाळा नसून हे एक संस्कार केंद्र आहे. जिल्ह्यातील एक उपक्रमशील व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारे आणि अनेक स्पर्धा परीक्षा मध्ये अव्वल असणारे आमचे संस्कारकेंद्र आहे. आगामी कालावधीत बँकॉक येथील दोन विद्यार्थ्यांचे प्रवेश या शाळेत होणार असल्याची माहिती मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी दिली तर मातृभाषेतून मुले लवकर शिकतात शिक्षणासोबत संस्काराची जोड असणारी ही शाळा आहे त्यामुळे मी ही शाळा निवडली असल्याचे पालक सोपान निकम म्हणाले.

# श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्था सोयगाव यांची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

सोयगाव,दि.२८ जुलै -येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्था सोयगावची वार्षिक सर्वसाधारण सभा पतसंस्थेचे चेअरमन शकूर शेख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या सभेस प्रमुख अतिथी म्हणून तालुक्यातील ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक संजय पाटील हे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्येची आराध्य देवता माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. मान्यवरांचा सत्कार प्रास्ताविकानंतर सर्वप्रथम माजी चेअरमन भास्कर चौधरी,दिवाकर चोपडे,पतसंस्थेचे चेअरमन शकूर शेख,सेवानिवृत्त झालेले शिक्षक बांधव, उच्च शिक्षणात गुणवंत ठरलेले शिक्षकांचे पाल्य,शैक्षणिक क्षेत्रात तालुका



व जिल्हा पातळीवर पुरस्कार मिळालेले शिक्षक बांधव,तसेच विविध अतिथी यांचा पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन रघुनाथ काटोले यांनी मागील आर्थिक वर्षाच्या सर्व आर्थिक व्यवहारांचा सविस्तर लेखाजोखा उपस्थित सर्व सभासदांसमोर मांडला. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये पतसंस्थेचे माजी चेअरमन भास्कर चौधरी,दिवाकर चोपडे, पतसंस्थेचे चेअरमन शकूर शेख,संचालक कृष्णा पाटील, व्हाईस चेअरमन रघुनाथ काटोले,मानद सचिव संदीप सोनवणे,संचालक संदीप चौधरी व इतर संचालक त्याचबरोबर परमानंद जयस्वाल,संचालक दुर्गादास बलांडे, नितीन पाटील,संचालक पंकज रगडे,संचालक विठ्ठल राठोड,किरण पाटील,शोभा पाटील,रामेश्वर सावळे,रामदास फुसे,रविंद्र तायडे,प्रताप साळुंखे,रविंद्र पाटील,रामदास चंडोल,पारसिंग चव्हाण,संजय चव्हाण,योगेश पाटील, येशीनाथ गवळी,नितेश गव्हांडे,मयुर काळे,दीपक नगरे, आदी अनेक शिक्षक बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# इंदिरानगरवासीयांचे आमरण उपोषण मागे; प्रशासनाने प्रस्ताव सादर केल्याने घेतला निर्णय

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि. २८ जुलै - कन्नड शहरातील म्हाडा परिसरातील इंदिरानगर वसाहतीमधील नागरिकांनी आपल्या घरांचा कायदेशीर हक्क आणि अतिक्रमित भूखंडांचे नियमबद्धीकरण या मागणीसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण अखेर मागे घेतले आहे. प्रशासनाने या प्रकरणातील प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केल्याची अधिकृत माहिती दिल्यानंतर नागरिकांनी आंदोलन थांबवण्याचा निर्णय घेतला.

या आंदोलनात महिलांचाही सक्रीय सहभाग होता. या आंदोलनाचे नेतृत्व मनोज बाविस्कर यांनी केले. त्यांचा पुढाकार आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे प्रशासन हालचालीस प्रवृत्त झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.



हा लढा केवळ इंदिरानगरवासीयांच्या हक्कांचा होता. दोनवेळा लेखी आश्वासन देऊनही आम्हाला काहीच मिळत नव्हतं. अखेर लोकशक्तीच्या जोरावर प्रशासन हालचाल करू लागलं. प्रस्ताव सादर झाल्याने आम्ही आमरण उपोषण मागे घेतो, मात्र निर्णयाची वाट पाहणारच.

– मनोज बाविस्कर, आंदोलक

याआधी १९ मे २०२५ रोजी इंदिरानगरमधील रहिवाशांनी एकदिवसीय उपोषण करून नगरपरिषद प्रशासनाकडून लेखी आश्वासन घेतले होते की, १५ दिवसांत प्रस्ताव सादर केला जाईल. मात्र दोन महिने उलटून गेले तरी कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांनी २८ जुलै रोजी आमरण उपोषण सुरू केले होते. या मागणीसाठी आधीच १७ एप्रिल २०२५ रोजी नगरपरिषदेकडून अधिकृत पत्र देण्यात आले होते. त्यानंतर भूमिअभिलेख विभागाकडे मोजणी फी भरून मोजणी पार पडली होती. तसेच नियमितीकरणासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करूनही निर्णय प्रलंबित राहिला होता. या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक संतोष गोरड यांनी सांगितले की, इंदिरानगर रहिवाशांच्या मागण्या लक्षात घेऊन प्रस्ताव तयार करण्यात आला असून, तो जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात आलेला आहे. पुढील प्रक्रियाही लवकरच सुरू होईल.

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २३२/२०२५

१/- प्रल्हाद रामचंद्र मोरे, वय ५५ वर्ष, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/- लालचंद रामचंद्र मोरे, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

नित

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत मधुराबाई रामचंद्र मोरे यांचा दि. ०१/०६/२०२५ रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते २ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत माधुराबाई रामचंद्र मोरे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. २५/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. १९/९/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय व स्तर गंगापुर यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५०४/२०२५ पुढील तारीख ०४/०९/२०२५

अर्जदार : १) सुमनबाई भ्र.भानुदास दाभाडे, रा.वडगाव रामपुरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) जिजाबाई भ्र.दशरथ औचरमल, रा.घर नं. ४/१७/३९, भोईवाडा, तिरुपती लॉज मागे, औरंगाबाद ४३१००१ ३) कडुबा पिता किसन भुजंग, रा.घर नं. ४/१६/९६, ट्रेड युनियन सेंटर समोर, मिल कॉर्नर, कोतवालपुरा, औरंगाबाद ४) अन्ना पिता किसन भुजंग, रा.घर नं. ४/१६/९६, ट्रेड युनियन सेंटर समोर, मिल कॉर्नर, कोतवालपुरा, औरंगाबाद ५) शोभा भ्र.सुनीलकुमार बर्वे, रा. लक्ष्मी बर्फ कारखान्याजवळ, मन्सुरी कॉलनी, गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६) विद्या भ्र. विश्राम भुजंग, रा.ट्रेड युनियन सेंटर समोर, मिल कॉर्नर, कोतवालपुरा, औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : छबुबाई धनाजी औचरमल, रा.तुर्काबाद खराडी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

प्रकरण – वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.ए.एस.बर्वे आणि ॲड. व्ही. आर. माघाडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार है वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अनुसयाबाई किसन भुजंग यांचा दि.१०/१२/२०२१ रोजी भोईवाडा, मिल कॉर्नर, औरंगाबाद येथे वृध्दापकाळामध्ये मृत्यु झाला आहे. मयत अनुसयाबाई किसन भुजंग यांचे पती नामे किसन शिवराम भुजंग यांचा दि.२३/०८/१९८० रोजी घर नं. ४/१६/९६, ट्रेड युनियन सेंटर समोर, मिल कॉर्नर, कोतवालपुरा, औरंगाबाद येथे वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला असुन सदर मयतांचे, आपसातील नाते पती पत्नीचे होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. १ ते ५ आणि गैरअर्जदार यांचा जन्म झाला आहे.

मयतांचे वारसांपैकी त्यांचा मुलगा विश्राम किसन भुजंग यांचा दि.२०/०३/२०१८ रोजी घर नं. ४/१६/९६, मिल कॉर्नर, भोईवाडा, औरंगाबाद येथे मृत्यु झाला असुन अर्जदार नं. ६ हि मयताची पत्नी आहे. आपसात दर्शविलेल्या नातेसंबंधाप्रमाणे मयतांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना मौजे जोगेश्वरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील शेत जमीन गट नं. ९४. एकुण क्षेत्र ९ हे. १३ आर. मधील मयत अनुसयाबाई किसन भुजंग यांचे नावे असलेली २ है. ४३ आर. व पोटखराबा ११ आर. क्षेत्रफळाची जमीनीचे अनुषंगाने नामांतरासाठी व तसेच शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २८/०७/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, गंगापुर

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २१७ /२०२५

१/- कमलबाई धोंडू पाटील, वय ६६ वर्ष, धंदा घरकाम, रा. गोंदेगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- सुवर्णा राहुल निकम, वय ३० वर्षी, धंदा, घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ३/- नावीन्या राहुल निकम, वय ९ वर्षे, अ. पा. क. म्हणून अर्जदार क्र. २ ४/- कुंदन राहुल निकम, वय २ वर्षे, अ. पा. क. म्हणून अर्जदार क्र. २

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत राहुल धोंडू निकम यांचा दि. १०/०५/२०२५ मौजे जोगेकर हॉस्पिटल, ता. खंडाळा, जिल्हा सातारा, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहेत. असे की मयत राहुल धोंडू निकम यांचे स्टेट बँक इंडिया मध्ये खाते क्र. ३६५२०३९२१२१९असा असून रुक्कम १७,४८९ रुपये असून ते मिळण्याकरिता असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत राहुल धोंडू निकम यांचे वारस असुन त्यांना सदरची रक्कम काढण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस ण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. २५/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता २५/०८/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

१ मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७४ /२०२५

१/- विमलबाई नथा चौथमल, वय ७७ वर्ष, धंदा घरकाम, रा. हनुमंतखेडा, ता. सोयगाव, जिन्हा छत्रपती संभाजीनगर, २/- नामदेव नथा चौथमत, वय ३७ वर्षी, धंदा, शेती, रा. वरीलप्रमाणे, २/- माधवराव नथा चौथमल, वय ५० वर्षे, रा. हनुमंतखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, ४/- शीताबाई पुंजाराम गरुड, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. शिंदी, ता. चाळीसगाव, जि. जळगाव. ५/- नीताबाई विजय सोनवणे, वय ५० वर्षे,, धंदा घरकाम, मेहुणबारे, ता. चाळीसगाव, जि. जळगाव.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नथा आश्रू चौथमल यांचा दि. ०९/११/२०२२ मौजे हनुमंतखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत नथा आश्रू चौथमल यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. २५/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. १३/०८/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) औरंगाबाद यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २३३/२०२५

१/- सुमनबाई ओंकार शिंदे, वय ६९ वर्ष, धंदा घरकाम, रा. घोसला, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- भावना रविंद्र शिंदे, वय ४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. सिद्धीविनायक मंदिर, A-१४, गणेश हौसीग सोसायटी, ९० फुट रोड, LBS नगर, साकीनाका S.O. मुंबई ४०००७२. ३/- रोहित रवींद्र शिंदे, वय २६ वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे. ४/- चिन्मयी रवींद्र शिंदे, वय २३ वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रविंद्र ओंकार शिंदे यांचा दि. ०६.०६.२०२५ रोजी मौजे सिद्धीविनायक मंदिर, A-१४, गणेश हौसीग सोसायटी, ९० फुट रोड, LBS नगर, साकीनाका S.O. मुंबई ४०००७२ येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे एकमेव वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत रविंद्र ओंकार शिंदे यांचे वारस असुन त्यांना मयत रविंद्र ओंकार शिंदे यांना शासकीय व निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्र करिता आवश्यक आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि.२८/७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता २९/९/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## अग्रलेख...

# अखेर मालदीवला झाली उपरती

मालदीवला अडीच हजार वर्षांचा समृद्ध इतिहास लाभला आहे. कधीकाळी बौद्ध आणि हिंदू धर्मीयांचे प्राबल्य असलेला इवलासा मालदीव आता मुस्लिमबहुल देश आहे. व्यापार आणि धर्मप्रसारासाठी जगभर आपली गलबते आणि मोठी जहाजे घेऊन फिरणारे अरब व्यापारी मालदीवमध्ये मुक्कामाला असत. हिंदी महासागरात वसलेल्या या बेटावर पाचव्या शतकापासून मानवाने वस्ती करायला प्रारंभ केला. श्रीलंका आणि दक्षिण भारतातील नागरिक मोठ्या संख्येने येथे येऊन वसले. श्रीलंकन नागरिकांची संख्या असल्याने बौद्ध धर्मीयांची संख्या बहुसंख्य होती. मालदीवमध्ये १४०० वर्षे बौद्ध नांदत होते. त्याच्यासोबत हिंदू असलेले तमिळही सुखात होते. पण, संयमी, मवाळ आणि सर्वांना सामावून घेणाऱ्या जमाती दिसल्या की प्रलोभने दाखवीत अथवा बलपूर्वक त्यांची संस्कृती नष्ट करण्याचा कुटिल खेळ अरबांनी सुरू केला होता. त्याला मालदीवमधील बौद्धही बळी पडले. आठव्या शतकात जे सिंधमध्ये घडले ते मालदीवमध्येही दिसून आले. बाराव्या शतकात मालदीवला पूर्णपणे इस्लाममध्ये परिवर्तित करण्यात आले. शेवटचा बौद्ध शासक धोवेमी यांनी ११५३ मध्ये इस्लाम स्वीकारला आणि स्वतःला सुल्तान मोहम्मद अल-अदिल म्हणून घोषित केले. तेव्हापासून येथे सुल्तान राज्य करू लागले. या देशात विविध प्रकारचे शंख मोठ्या प्रमाणात आढळतात. बहुमूल्य शंखांचा उपयोग चलन म्हणूनही केला जात असे. पंधरा वर्षे पोर्तुगीजांनीही येथे राज्य करून पाहिले पण त्यांना लवकरच हाकलण्यात आले. जवळच असलेला सिलोन अर्थात श्रीलंका डचांच्या ताब्यात होता. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात श्रीलंका ब्रिटिशांच्या ताब्यात आल्यानंतर मालदीवही ब्रिटिशांचाच अंकित बनला. १९६५ पर्यंत मालदीव ब्रिटिशांचा गुलाम होता. २६ जुलै १९६५ रोजी मालदीव स्वतंत्र होऊन इब्राहिम नासीर सुल्तान झाले. पण सुखाने नांदतील ते सुल्तान कसले? मोहम्मद फरीद दीदी यांनी सत्ता हाती घेऊन स्वतःला राजा म्हणून घोषित केले. तीन वर्षे गोंधळ माजल्यानंतर १९६८ मध्ये दीदीची हकालपट्टी करण्यात आली आणि सोबतच मालदीवच्या जनतेने राजेशाहीला लाथ मारून नोव्हेंबर १९६८ मध्ये प्रजासत्ताक मालदीव म्हणून घोषित केले. मौमून अब्दुल गयूम हे मालदीवचे सर्वाधिक लोकप्रिय अध्यक्ष होते. ते सहावेळा अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. गयूम यांच्याविरोधात नोव्हेंबर १९८८ मध्ये मोठा उठाव झाला होता. तेव्हा भारताने सैन्याची मदत पाठवून उठाव मोडून काढला होता. मुस्लिम देशांमध्ये लष्करी उठाव, मार्शल लॉ लागू करणे, सत्तेसाठी सत्ताधारी अथवा विरोधकांच्या हत्या घडविणे सामान्य गोष्टी असतात. आपले शेजारी अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश या देशांची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. २०२३ मध्ये झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पीपल्स नॅशनल काँग्रेसचे उमेदवार मोहम्मद मुईझ्झू विजयी झाले. सत्तेवर येताच त्यांनी भारताविरोधात पावले उचलायला प्रारंभ केला. त्यांचा ओढा चीनकडे जास्त होता. अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर मुईझ्झू प्रथम तुर्की आणि चीनच्या दौऱ्यावर गेले होते. एरवी निवडणुकीत विजयी झाल्यानंतर यापूर्वीच्या अध्यक्षांनी जवळचा सहकारी म्हणून भारताला भेट दिली होती. चीनच्या सहकार्याने मुईझ्झू यांनी भारताला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न चालविले होते. निवडणुकीच्या काळातच प्रचारसभांमध्ये 'इंडिया गो आऊट'चा नारा देत ते सत्तेवर आले होते.

भारतीयांचा प्रभाव कमी करण्यासाठी आणि मालदीवमध्ये तैनात असलेले ८० भारतीय सैनिकांना परत बोलवावे यासाठी मुईझ्झू भारताला धमक्या देत होते. खरे तर त्यांना दीर्घकालीन चालत आलेली परिस्थिती पूर्णपणे बदलवून चीनच्या जवळ जायचे होते. एक स्वतंत्र आणि सार्वभौम देश म्हणून कुणाशी मैत्री करायची हा त्यांचा प्रश्न होता. पण, मालदीव सरकारमधील तीन उपमंत्र्यांनी काहीही कारण नसताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वैयक्तिक पातळीवर टीका केली. मंत्र्यांच्या या वादग्रस्त वक्तव्यांमुळे भारतीयांमध्ये संतापाची लाट उसळली. बॉयकॉट मालदीवचा ट्रेंड सोशल मीडियावर फिरू लागला. पंतप्रधान मोदी यांनी टीकेला प्रत्युत्तर न देता लक्षद्वीपच्या समुद्र किनाऱ्यावर जात भारतीयांनी या बेटाला भेट द्यावी, असे आवाहन आपल्या कृतीतून केले. भारतीयांना मोदींनी दिलेला संदेश कळला आणि मग काय पर्यटकांनी मालदीवऐवजी लक्षद्वीपकडे मोर्चा वळविला. आम्ही लहान असू पण तुम्हाला आमच्यावर दादागिरी करण्याचा परवाना मिळाला नसल्याचे वक्तव्य अध्यक्ष मुईझ्झू यांनी करीत आगीत तेल ओतले. मालदीवमधील पर्यटन व्यावसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली. भारतीय पर्यटकांनी पाठ फिरविल्याने समुद्र किनारे ओस पडू लागली. हॉटेल्सची बुकिंग धडाधड रद्द होऊ लागली. भारतीय सरकारने काहीही प्रतिक्रिया दिली नव्हती पण जनतेच्या बहिष्कारामुळे आपण फार मोठी चूक केली हे मुईझ्झू यांच्या लक्षात आले. मोदींवर टीका करणाऱ्या तिन्ही उपमंत्र्यांची हकालपट्टी करण्यात आली. पण, बाण सुटला होता. मोईझ्झू नरमले असले तरी त्यांच्या मनातील भारतद्वेष सर्वांना दिसून आला. पुढे जे होईल ते केवळ व्यावहारिक पातळीवर होईल, त्यात पूर्वीसारखी आपुलकी, मित्रत्वाचे भाव नसतील याची जाणीव मोईझ्झू यांना भारताच्या प्रतिसादातून झाली. ज्या देशाने कधी कुणाची एक इंचही जमीन बळकावली नाही, जो शेजाऱ्यांना सातत्याने सर्वप्रकारचे सहकार्य करतो त्या भारतासोबत चीन, तुर्की, पाकिस्तान या देशांच्या प्रभावात येऊन संबंधात वितुष्ट आणणे म्हणजे चालत्या गाडीच्या चाकातील खिळा काढण्यासारखे होते. मालदीवची अर्थव्यवस्था पूर्णपणे पर्यटनावर अवलंबून आहे आणि या इस्लामिक देशाला भेट देणारे आणि त्यांच्या आर्थिक उत्पन्नात भर टाकणारे सर्वाधिक पर्यटक हे भारतीय असतात. भारताला डिवचल्याचा परिणाम असा झाला की अवघ्या पंधरा-वीस दिवसांमध्येच मालदीवला १५ कोटी रुपयांचा फटका बसला. जेमतेम पाच लाख लोकसंख्या असलेल्या या देशासाठी १५ कोटी रुपये म्हणजे फार मोठी रक्कम आहे. मालदीवचे सरकार आणि जनतेची अक्कल थोड्याच दिवसांत ताळ्यावर आली. भारताने मदत करणे थांबविल्यास देश दिवाळखोरीत निघाल्याशिवाय राहणार नाही आणि अशा संकटसमयी ना तुर्की, पाकिस्तान मदतीला येईल ना चीन याची जाणीव मुईझ्झू यांना झाली. त्यांनी भारताशी संबंध सुधारण्यास प्राधान्य दिले. मोदी सरकारनेही मनाचा मोठेपणा दाखविला. २०२४ मध्ये नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान झाल्यावर मुईझ्झू शपथग्रहण समारंभाला दिल्लीला आले होते. ऑक्टोबर २०२४ मध्ये अधिकृतपणे भारताच्या दौऱ्यावर आले होते. भारत हटावचा नारा देणारे मुईझ्झू यांचे धोरण आणि वागण्यातील व्यावहारिक बदल त्यांच्यासाठी अपरिहार्य असल्याची जाणीव भारतालाही आहेच. नेबरहूड फर्स्ट या धोरणाचा मालदीव हा भाग आहे. शेजारी आमच्यासाठी प्राधान्यस्थानी असल्याची भूमिका भारताने स्वीकारलेली आहे. २०२४ मध्ये 'इंडिया आऊट' म्हणणारे मुईझ्झू यांनी 'वेलकम इंडिया' ही मोहीम सुरू केली आहे. जास्तीत जास्त भारतीय पर्यटकांनी मालदीवला भेट द्यावी हे या मोहिमेमागील उद्दिष्ट आहे. इंग्लंडसोबत ऐतिहासिक व्यापार करार झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी २६ जुलैला मालदीवच्या दोन दिवसीय दौऱ्यावर दाखल झाले. मालदीवचा विकास व्हावा आणि त्याच्या क्षमता वाढविण्यासाठी भारत नेहमीच सहकार्य करण्यास तयार असल्याचे पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले. मालदीवच्या स्वातंत्र्यदिनाचे प्रमुख पाहुणे म्हणजे मोदी यांची उपस्थिती होती. भारताकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मुईझ्झू यांची आशा पंतप्रधान मोदींनी पूर्ण केली. मालदीवला ४८५० कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा याप्रसंगी मोदींनी केली. केवळ आपले शेजारीच नव्हे तर जगातील प्रत्येक देशासोबत मैत्रीचे संबंध ठेवण्याला भारत प्राधान्य देतो. दुर्दैवाने भारतासारख्या विशाल हृदय असलेल्या देशासोबत मैत्रीऐवजी फटकून आणि शत्रुत्वाने वागणारे पाकिस्तान, चीन, बांगलादेश, नेपाळसारख्या देशांचा शेजार आपल्याला लाभला आहे. मालदीवने कुरापती काढूनही त्याला मोठ्या मनाने सहकार्य करण्याचे आणि शेजारी देश म्हणून बरोबरीने वागविण्याचे औदार्य भारताने दाखविले आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

क्रिकेट कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी खुद्द पंचानींच निवृत्तीची घोषणा करावी तसा काहीसा प्रसंग संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी घडला. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे अध्यक्षही असतात. अधिवेशन सुरू झाल्यावर त्यांनी पहिल्या दिवशी संपूर्ण कामकाजात भाग घेतला, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकी बोलविल्या. दुसऱ्या दिवशीच्या कामकाजाचे नियोजन केले आणि रात्री वैद्यकीय कारणांसाठी आपण उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देत असल्याचे घोषित केले. त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला असून, लवकरच निवडणूक आयोग उपराष्ट्रपतिपदासाठी निवडणुकीची घोषणा करतील.

राष्ट्रपतींच्या निवडणुकीत सर्व राज्य विधानसभांचे आमदार मतदान करीत असतात. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत फक्त संसदेच्या दोन्ही सभागृहांचे खासदार मतदान करीत असल्याने भाजप नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा उमेदवार निवडून येण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

संसदेच्या दोन्ही सभागृहांत सरकारजवळ बहुमत असल्याचे या निवडणुकीत काही चुरस असेल असेही मानले जात नाही. निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केल्यावर सत्ताधारी पक्ष आपल्या उमेदवाराचे नाव घोषित करेल असे समजते.

**राजीनाम्याचे कारण** : जगदीप धनकड यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ बाकी असताना त्यांनी राजीनामा का दिला याबाबत राजधानीत उलटसुलट चर्चा सुरू असली तरी त्यांनी स्वतः सांगितलेले कारण खरे मानले पाहिजे. मागील काही काळात त्यांची प्रकृती जरा नाजूक झाली होती. त्यांनी वैद्यकीय सल्ला स्वीकारीत पायउतार होण्याचा निर्णय घेतला असे दिसते.

**एक चकमक** : राष्ट्रपती-उपराष्ट्रपती यांच्यात मतभेद होण्याच्या घटना तशा नव्या नाहीत. डॉ. शंकरदयाल शर्मा उपराष्ट्रपती असताना त्यांची राजीव गांधी सरकारशी चकमक झडली होती. विषय होता बोफोर्सचा. प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला होता. सरकारच्या उत्तराने प्रश्न विचारणाऱ्या विरोधी खासदाराचे समाधान होत नव्हते. डॉ. शर्मा यांनी त्यात हस्तक्षेप करीत तत्कालीन मंत्री पी. चिदंबरम् यांना नेमके उत्तर देण्यास सांगितले. याने चिदंबरम् चिडले. यातच डॉ. शर्मा आणि पी. चिंदबरम् यांच्यात शाब्दिक चकमक झडली.

## कानोसा

**अमोल पुसदकर**

"यावत जीवेत सुखम जीवेत, ऋणम् कृत्वा घृतं पिबेत, भस्मिभूतस्य शरीरस्य, पुनरागमनं कुतः" असे विचार नास्तिकवादी ऋषी चार्वाक यांनी व्यक्त केलेले होते. परंतु भारतीय माणसाने या विचारांवर कधीही श्रद्धा ठेवली नाही. आम्हाला कोणाचा एक रुपया जास्तीचा नको आणि कोणाची आमच्यावर उधारी सुद्धा राहायला नको असे म्हणणारे लोक होते. मी कोणाची उधारी घेऊन मरणार नाही अशा पद्धतीचा बाणा अनेक लोकांचा होता. परंतु भारतीय रिझर्व्ह बँकेने सादर केलेल्या आकडेवारीवरून असे लक्षात येत आहे की भारतीयांचे बचतीचे प्रमाण घटलेले आहे. भारतीय माणसाचा ओढा हा कर्ज घेऊन जीवनाला आवश्यक गोष्टींची पूर्तता करण्यामागे तसेच चैनीच्या वस्तू खरेदी करण्यामागे दिसून येत आहे.

**पूर्वी लोक त्याच गोष्टी खरेदी करायचे ज्यांची त्यांना आवश्यकता होती, परंतु आता शेजाऱ्याने घेतले आहे, नातेवाईकांनी घेतले आहे म्हणून मी पण घेतले पाहिजे अशा पद्धतीची विचारसरणी अनेकांची दिसून येते. त्यामुळे अनेक गोष्टींचा संग्रह वाढलेला आहे. त्यांची पूर्तता करण्यासाठी कर्ज घ्यावे लागत आहे. कर्ज घ्यायचे नसेल तर क्रेडिट कार्ड हा सुद्धा एक पर्याय लोकांजवळ उपलब्ध आहे. त्यामुळे क्रेडिट कार्डवर वस्तू खरेदी करणे आणि त्याचे पैसे भरत राहणे असे सुद्धा प्रकार सर्वत्र दिसून येतात. यावरून 'उद्या कोणी पाहिलेला आहे' अशा पद्धतीची भावना सुद्धा लोकांची दिसून येते. ज्यांच्या घरची कार महिन्यातून एकदाच बाहेर निघते त्यांनी पण सामाजिक संकेत म्हणून ती विकत घेतली आहे. घरातील अनेक वस्तू अशा आहेत की ज्यांचा कुठलाही नियमित वापर नसताना सुद्धा आज त्या संग्रही आहेत. त्याकरिता पैसे खर्च केले गेलेले आहेत. कपड्यांचेही तसेच आहे. अनेक कपडे अनेक दिवसपर्यंत वापरले जात नाहीत, परंतु घेतले मात्र जातात. चप्पल आणि बुटांचेही तसेच आहे. अनेकांना नवीन घेतल्यावर चार दिवस वापरली आणि त्यानंतर वापरण्याचा योग आला नाही असे पण दिसून येते.**

आज लोक कर्जाचे हप्ते भरण्यासाठी जगत आहेत का असाही प्रश्न निर्माण होतो. माझे एक मित्र मला म्हणाले की, मला आता तब्येत चांगली ठेवावी लागेल. मी म्हणालो का बरं? तर ते म्हणाले, आता दोन कोटींचे कर्ज घेतलेले आहे. त्यामुळे ते फेडण्यासाठी आणखी काही वर्ष काम करण्याची आवश्यकता आहे.

# शक्तिपीठाचं आव्हान अनिलकुमार गायकवाड यांच्या समर्थ हाती

राज्यात कोणताही महत्त्वाकांक्षी प्रकल्प असला तरी त्याला विरोध होतोच. राज्यकर्ते आणि सरकारची भूमिका विकासाची असते; परंतु ही भूमिकापर्यंत ज्यांची जमीन प्रकल्पासाठी जाते, त्यांना पटतेच असे नाही. अशावेळी कठीणातल्या कठीण प्रसंगातून मार्ग काढण्याची कसोटी ज्यांच्याकडे आहे, त्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार बी. गायकवाड यांच्यावर ती जबाबदारी येऊन पडते. आतापर्यंतच्या पूर्वानुभावातून अनिलकुमार गायकवाड यांनी बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गासह अन्य अनेक प्रकल्पाचे भूसंपादन यशस्वी करून प्रकल्प मार्गी लावले. आता नागपूर-पणजी शक्तिपीठ महामार्गाची जबाबदारी राज्य सरकारने गायकवाड यांच्यावर सोपवले असून त्यांनी ते काम हाती घेतले आहे.

महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा देशाच्या आर्थिक राजधानीला आणि महाराष्ट्राच्या उपराजधानीला जोडणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. या प्रकल्पालाही सुरुवातीला शेतकर्यांनी विरोध केला. त्या अगोदर मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हे तर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते. या मार्गाच्या भूसंपादनासाठी ही शेतकर्यांनी विरोध केला होता. ज्यांच्या जमिनी जातात, ज्यांची घरे जातात, शेती, विहीर, बागायत जाते, ते रस्त्यावर येतात, त्यांचे दुःख जाणणाराच अशा प्रश्नांतून मार्ग काढण्यात यशस्वी होत असतो. यापूर्वीचे मुळशी धरणासह अनेक धरणग्रस्तांचे पुनर्वसनाचे अनुभव लक्षात घेता शेतकरी सहसा जमिनी द्यायला तयार होत नाहीत. सरकारही सुरुवातीला शासकीय दराचा आग्रह धरते; परंतु शेतकर्यांनी आंदोलनाचा बडगा उघडला आणि ठामपणे विरोध केला, की सरकार शेतकर्यांपुढे नमते असेही वारंवार दिसले आहे.

काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प असे असतात, की जे राज्याच्या विकासाला गतिमान करतात, असे प्रकल्प वेळेत पूर्ण झाले तर राज्याची अर्थव्यवस्था ही गतिमान होते. या प्रकल्पांसाठी त्यामुळे दोन पैसे जास्त खर्च झाले, शेतकर्यांना दोन पैसे मिळाले, तर त्यात वावगे काहीच नसते; परंतु बर्याचदा शासन आणि भूसंपादन अधिकार्यांची भूमिका आंदोलनातून मार्ग काढण्याऐवजी कर्मठपणाची असते. त्यातून प्रश्न चिघळतो. अनेकदा भूसंपादनाच्या विरोधात शेतकरी न्यायालयात जातात. त्यामुळे प्रश्न सुटत नाही. प्रकल्पाला विलंब होतो आणि संबंधित प्रकल्पाचा प्रचलित दर (डीएसआर) वाढत जातो. प्रकल्पाचा खर्च वाढतो. त्यामुळे सरकारचेही नुकसान होते. अशा वेळेला सरकार आणि भूसंपादन अधिकार्यांनी दोन पावले पुढे येऊन शेतकर्यांच्या समस्या सोडवल्या, त्यांच्या मागणीप्रमाणे त्यात काही तडजोड करून नुकसान भरपाई देण्याची तयारी दाखवली आणि प्रत्यक्षात प्रकल्प पूर्ण



होताना प्रकल्पाचा एक भागीदार म्हणून त्याला सहभागी करून घेतले तर प्रश्न सुटतात.

आता महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे विकसित भूखंड किंवा विमानतळाचे विकसित भूखंड संबंधित शेतकर्यांना दिले जातात, त्यातून त्याला उद्योग, व्यवसाय सुरू करता येतो आणि नियमित उत्पन्नाचे शेतीचे साधन गेले, तरी पर्यायी साधन त्याला मिळत असल्याने त्याचे फारसे नुकसान होत नाही. अशा वेळेला शेतकरी सरकारच्या भूमिकेला पूरक भूमिका घेत असतो. राज्यात यापूर्वी झालेल्या अनेक प्रकल्पांना ज्या ज्या शेतकर्यांनी विरोध केला, त्या शेतकर्यांना आपलेसे करून त्यांना समजावून घेऊन अनिलकुमार गायकवाड यांनी कोणताही दबाव न आणता संबंधितांना आपल्या जमिनी प्रकल्पांना द्यायला राजीखुशीने भाग पाडले, त्यांची ही कला राज्य सरकारला आता चांगलीच माहिती झाली असल्याने त्यांच्या या कलेचा उपयोग करून घेऊन विकासाचे अनेक प्रकल्प राबवण्याचा सरकारचा प्रयत्न असतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आता त्यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असलेल्या नागपूर गोवा शक्तिपीठ महामार्गाला होत असलेल्या विरोध पाहून त्यातून मार्ग काढण्याची जबाबदारी अनिलकुमार गायकवाड यांच्यावर सोपवली आहे. त्यातून त्यांचे महत्त्व लक्षात यायला हरकत नाही. मुंबई-नागपूर हा ७०१ किलोमीटरचा मार्ग आता प्रत्यक्षात आला आहे.

पूर्वीच्या तुलनेत निम्म्या वेळेत आणि अतिशय चांगल्या रस्त्याने मुंबई-नागपूरशी जोडली आहे. त्यामुळे या रस्त्याच्या शेजारच्या अनेक जिल्ह्यांचा मुंबई आणि नागपूरशी संपर्क सुरू झाला आहे. या पुढचा प्रकल्प हा छत्रपती संभाजीनगर ते जळगाव, इगतपुरी ते पालघर असा असणार आहे आणि त्याचीही जबाबदारी अनिलकुमार यांच्यावर आली आहे. वाढवण हे बंदर नव्याने विकसित होत असून जगातील पहिल्या दहा बंदरात त्याचा समावेश आहे. या बंदराचा मध्य आणि ईशान्य भारताची तसेच दक्षिण भारताची संपर्क यावा, म्हणून आता समृद्धी महामार्गाचे अन्य महामार्गाशी जोडण्याची जबाबदारी अनिलकुमार गायकवाड यांनी शिरावर घेतली आहे. त्याचबरोबर आता मुख्यमंत्री फडणवीस यांचा आणखी एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून नागपूर-पणजी या प्रकल्पाकडे पाहिले जाते. नागपूरहून पणजीला अवघ्या आठ तासात पोहोचता येईल असे स्वप्न केंद्रीय रस्ते बांधणी मंत्री नितीन गडकरी आणि फडणवीस यांनी पाहिले आहे. या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी आता त्यांनी पाऊल उचलले असून भूसंपादनासाठी वीस हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे; परंतु कोल्हापूर, धाराशिव, नांदेड व अन्य जिल्ह्यातून या प्रकल्पाला मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे.

शेतकर्यांनी ठिकठिकाणी आंदोलने केली आहेत. त्याचबरोबर सरकारही या प्रकल्पाचे भूसंपादन जलद गतीने व्हावे, यासाठी प्रयत्नशील आहे. सरकार आणि शेतकर्यांची भूमिका परस्परविरोधी असल्याने हा प्रकल्प खरोखरच मार्गी लागेल का याबाबत अनेकांच्या मनात साशंकता आहे, ही साशंकता दूर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाची जबाबदारी आता अनिलकुमार गायकवाड यांच्यावर सोपवली आहे. हा प्रकल्प ज्या भागातून जातो त्याच भागातून अनिलकुमार गायकवाड आलेले आहेत. त्यांचा जिल्हा ही मराठवाड्यात आहे. अशावेळी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या तीन भागातील जिल्ह्यातील लोकांची मानसिकता तयार करून त्यांनी या प्रकल्पाला जमिनी द्याव्यात आणि सरकारनेही प्रकल्पग्रस्तांना शेतकर्यांचे समाधान होईल अशा प्रकारे नुकसान भरपाई द्यावी असा सुवर्णमध्य काढण्याचा प्रयत्न अनिलकुमार गायकवाड करीत आहेत. त्यासाठी त्यांनी आता विभागनिहाय बैठका घ्यायला सुरुवात केली आहे.

नागपूर-पणजी शक्तिपीठ महामार्ग हा राज्यातील अनेक महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना जोडणारा असून हा प्रकल्प केवळ रस्ता प्रकल्प नाही, तर त्याच्याभोवती जलसंधारणाचे आदर्शवत काम करण्याचा मुख्यमंत्र्यांचा मनोदय आहे. समृद्धी महामार्गाच्या बाजूंनी जशी काही हायटेक गावे बसवण्याचा प्रयत्न प्रकल्पातच अंतर्भूत करण्यात आला आहे. या प्रकल्पाबाबत तसाच प्रयत्न आहे. ही माहिती राज्यकर्त्यांनी सरकारला देणे आणि शेतकर्यांमधून किंवा सामान्यांतून रस्तेबांधणी क्षेत्रातील सर्वोच्च पदापर्यंत प्रवास केलेल्या अनिलकुमार गायकवाड यांनी समजावून देणे यात निश्चित फरक आहे. त्यामुळेच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीत त्यांनी नागपूर गोवा शक्तिपीठ महामार्गाची पार्श्वभूमी, त्याचे महत्त्व, त्याचा खर्च, रस्त्याच्या भोवतीच्या नाल्याचे रुंदीकरण, खोलीकरण, ग्रीन कॉरिडॉर आदींची माहिती देताना कोणत्याही परिस्थितीत बळजबरीने भूसंपाद न करता संवादाच्या माध्यमातून भूसंपादन करण्यावर त्यांनी भर दिला आहे.

छत्रपती संभाजी नगरला झालेल्या बैठकीला विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे मुख्य महाव्यवस्थापक श्रीमंत पाटोळे, महाव्यवस्थापक रामदास खेडकर, मुख्यमंत्री कार्यालयातील उपसचिव हनुमंत अरगुंडे, उपजिल्हाधिकारी तथा महामंडळाचे प्रशासक प्रशांत शेळके आदी या वेळी उपस्थित होते. गायकवाड यांनी ज्या पद्धतीने आतापर्यंत राज्यातील अनेक मोठमोठ्या प्रकल्पांची उभारणी केली आणि त्यात ते यशस्वी झाले त्याच पद्धतीने आता शक्तिपीठ महामार्गाचे काम मार्गी लावण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. हा प्रकल्प शेतकर्यांनाही कसा फायदेशीर ठरणार आहे, त्याचबरोबर या प्रकल्पांच्या बाजूंनी असणार्या जिल्ह्यात पिकणारा शेतीमाल थेट राज्याच्या दुसर्या टोकाला वेगाने पोहोचून त्यातून शेतकर्यांच्या आर्थिक उन्नतीला हातभार कसा लागेल, यासाठी अनिलकुमार गायकवाड प्रयत्न करत आहेत. अनिलकुमार गायकवाड हे एक उत्तम प्रशासक आहेत. त्याचबरोबर ते एक कुशल संघटक आहेत. त्यांच्यात एक चांगला संवादक दडलेला असल्यामुळे प्रकल्पाशी संबंधित सर्व घटकांशी विचारविनिमय करून ते निश्चित मार्ग काढतील, असा शासनाला विश्वास आहे. प्रचंड ऊर्जा आणि अफाट कार्यक्षमता असलेल्या अनिलकुमार गायकवाड यांनी पूर्वी ज्या गतीने आणि ज्या पद्धतीने विकासाचे प्रकल्प मार्गी लावले, त्याच पद्धतीने शक्तिपीठ महामार्गाचा प्रकल्प ही ते मार्गी लावतील, असा विश्वास या निमित्ताने व्यक्त केला तर ते वावगे ठरणार नाही.

मुख्यमंत्र्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी गायकवाड यांच्या सारखा निगर्वी अधिकारीच उपयोगी पडू शकतो, याची जाण शासनालाही आहे. त्यांची ही भूमिका लक्षात घेऊन शासनाने त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी टाकली आहे एखाद्या अधिकार्याला निवृत्तीनंतरही एवढी मोठी जबाबदारी दिली जाते, तेव्हा त्यात त्या अधिकार्याचा प्रामाणिकपणा, त्याची विश्वासार्हता, त्याची सचोटी, त्याची काम करण्याची पद्धत, कामाचा उरक, संबंधितांना विश्वासात घेण्याची प्रवृत्ती, प्रकल्प मार्गी लावताना संबंधित सर्वच घटकांना त्याचा फायदा कसा होईल हा दृष्टिकोन पाहिला जातो. अनिलकुमार गायकवाड यांच्या ठाई सर्व असल्याने ते हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निश्चित प्रयत्न करतील त्यासाठी सरकारलाही त्यांच्यावर आणखी काही काळ विश्वास ठेवावा लागेल असे वाटते.

**-अरुणकुमार एस. मुंदडा**
**मुख्य संपादक, अग्रसेन टाइम्स/**
**विक्रांद टाइम्स**

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# भारतीय अध्यात्म आणि विज्ञान

स्वामी विवेकानंदांनी आधुनिक भारताची संकल्पना मांडून देशवासीयांमध्ये नवी चेतना जागविली. विवेकानंदांचे अध्यात्म विज्ञानाशी एकरूप झालेले होते. शिकागोच्या धर्मपरिषदेत त्यांनी हिंदू धर्माला ग्लानी आल्याचे कबूल करतानाच कणखर आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पेरले. आज स्वामी विवेकानंदांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आधुनिक भारतावर आणि प्रामुख्याने तरुणाईवर येऊन पडली आहे. या दिशेने भारत अग्रेसरसुद्धा झाला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वामी विवेकानंदांच्या विज्ञानवादाचा आयुष्यभर पुरस्कार केला. भारतीय अध्यात्म आणि विज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. 'अध्यात्म म्हणजे 'स्व'चा शोध तर विज्ञान म्हणजे सत्याचा शोध घेणे होय.' आणि या दोन्ही बाबी एकमेकांना पूरक आहेत. भारतीयांच्या प्रत्येक परंपरा आणि चालीरीतींच्या मुळाशी विज्ञानच आहे आणि हे अनेकदा सिद्धसुद्धा झालेले आहे. अध्यात्माने सूक्ष्म जगाची कल्पना मांडली आहे. आणि या सूक्ष्म जगाचा शोध घेणे हाच विज्ञानाचा मूळ हेतू आहे. वेद, पुराणे आणि इतर धार्मिक ग्रंथांमध्येसुद्धा विज्ञानाची महती सांगितली आहे. रामदास स्वामी यांच्या दासबोधातातही याबाबत अनेक वचने आली आहेत. संत कबीर, संत तुकाराम यांच्या ईश्वरवादातही अध्यात्मसोबतच विज्ञानही दडलेले आहे. मात्र, आपण केवळ त्यांच्या ओव्यांचा वरवर विचार करतो. त्यातील सत्य उलगडण्याचा प्रयत्न पाहिजे त्या प्रमाणात होत नाही! हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख धर्मासारख्या विविध भारतीय आध्यात्मिक परंपरांमध्ये आत्मज्ञान आणि मुक्तीसाठी वेगवेगळे मार्ग सांगितले आहेत. परंतु, या सर्वांचा मूळ उद्देश एकच आहे. अर्थातच भौतिक जगाची कवाडे भेदून मोक्ष प्राप्त करणे हेच अंतिम उद्दिष्ट अध्यात्माने मनुष्य जीवनाचे मानले आहे.

प्राचीन भारताने खगोलशास्त्र, गणित, आयुर्वेद आणि धातुशास्त्र आदी क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात प्रगती साधली होती. परंतु, नंतर खुळचट समजुती चिकटल्या आणि मूळ हेतू बाजूला पडून देशाची कधीही भरून न निघणारी हानी झाली. परंतु, आता आधुनिक भारताने इतिहासातील चुकांमधून धडा घेतला आहे आणि अध्यात्माबरोबरच विज्ञानातही यशोशिखर गाठले आहे. विज्ञान बाह्य जगाचा अभ्यास करते तर अध्यात्म आंतरिक जगाचा, असाही एक समज आहे. याच आधारावर विनोबा भावे यांनी अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून 'सर्वोदय' ही संकल्पना मांडली. या संकल्पनेचा मूळ उद्देश नैतिक मूल्यांवर आधारित समाजनिर्मिती हा होता. काही विचारवंत विज्ञानाला वस्तुनिष्ठ आणि अध्यात्माला व्यक्तिनिष्ठ मानतात. हे खरे असले तरी या दोन्हींचा मूळ उद्देश एकच आहे. अशाही परिस्थितीत अध्यात्म विज्ञानापेक्षा श्रेष्ठ ठरते कारण अध्यात्मात संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची कामना केली जाते. संत ज्ञानेश्वर माउलीने विधात्यापुढे जे पसायदान मागितले त्यात संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची मागणी केलेली आहे. एकूणच अध्यात्म ही भारतीयांनी जगाला दिलेली सर्वांत मोठी देणगी होय. भौतिकवादी नागरिक नेहमी विज्ञानाला सर्वश्रेष्ठ मानतात. ज्या गोष्टी विज्ञानाच्या चौकटीत बसत नाही अशा गोष्टी मग या लोकांना चुकीच्या वाटू लागतात. जिथे मनुष्याची कल्पना शक्ती संपते तिथूनच खऱ्या अर्थाने भारतीय अध्यात्म सुरू होते. विज्ञान ही बाब प्राकृत आहे. तर अध्यात्म प्रकृतीच्याही पल्याड जाऊन प्राप्त होणारी अवस्था आहे! विज्ञानात ज्या बाबी बसत नाही आणि तरीही त्या घडल्या तर मग त्याला चमत्काराचे नाव दिले जाते. वास्तविक त्यामागेसुद्धा विज्ञानच असते. फक्त ते मनुष्याच्या आकलनापलीकडील असते आणि त्यामुळेच त्याला चमत्कार म्हटले जाते. या सर्व बाबींचे निराकरण अध्यात्माद्वारेच होऊ शकते. भारतीय अध्यात्माने सूक्ष्म देहाची संकल्पना मांडलेली आहे. मात्र, विज्ञानात ही बाब अद्याप सिद्ध झालेली नाही. किंबहुना मनुष्याने ती स्थिती अद्याप तरी प्राप्त केलेली नाही. परंतु, केवळ एवढ्याच सबबीवर सूक्ष्म देहाची कल्पना नाकारणे हा मूर्खपणा ठरेल. कारण, जगात कुठलीही बाब विनाकारण अस्तित्वात येत नाही. त्यामागे नक्कीच कोणती तरी शक्ती असते.

डोळ्यांनी दिसते तेवढेच सत्य नसते. जे डोळ्यांनी दिसत नाही तेच अंतिम सत्य असते आणि नेमका याचाच शोध अध्यात्माद्वारे घेतला जातो. दिसते ते क्षणभंगुर असते आणि जे दिसत नाही तेच अविनाशी आणि सर्वशक्तिमान असते, ही बाब विज्ञानालाही मान्य आहे. आज मनुष्य भौतिकवादात अडकून पडलेला आहे. परंतु, बऱ्याच पुढारलेल्या देशांमधील नागरिकांना भारताचा अध्यात्मवाद भुरळ घालत आहे. त्यामुळेच ते भारतात येऊन भारतीय परंपरा, चालीरीती आणि संस्कृतीचा अभ्यास करीत आहेत.

९८८१७१६०२७

## वाचक पत्रे

### आमचे श्रेष्ठत्व आणि राजकीय मंडळी

इंग्रजांमुळे समतेचे महापुरुष बनवले हे नक्की; कारण म्हणूनच बहुजनांना शिक्षण मिळाले, समतेचा अर्थ उमगला, आधुनिक सुधारणा वास्तवात आणल्या गेल्या. सध्या काय आहे? तर दीड लाख रु. महिन्याला वेतन असणारी जनसेवक म्हणविणारी मंडळी संसदेच्या भोजनालयात चहा १ रु., जेवण २ रु., मांसाहार २५ रु. देऊन मजा करीत आहेत. ६७४० जाती, थोर पुरुष यांच्या अगदी अलगद वाटण्या कोणी केल्या? आपणच ना? ज्यांनी जातिभेद, धर्मभेद, गरीब-श्रीमंत, प्रांतभेद निर्माण केले ते निष्कर्षवादी आपल्याला कमकुवत बनवून द्वेष रुजवून गेले आणि त्याच द्वेषाला आम्ही गोंजारतो आहोत. दगडापासून सर्वांमध्ये ईश्वर वास करतो या विचारांचे आम्ही रोहिदास, गोरा, सावता, वाल्मीक, नरहरी, चोखा, नामदेव यांना चांभार, कुंभार, माळी, कोळी, सोनार, महार, शिंपी अशी विशेषणे लावली. काय त्यांच्यात देवत्व नव्हते का? आदिवासी असो वा ब्राह्मण, बुद्ध असो वा मराठा, धनगर असो वा माळी किंबहुना मातंग सुद्धा या सर्व जातीत देवत्व नाही का? यालाच म्हणतात जातीचे राजकारण. जे राजकीय मंडळी स्वतःच्या स्वार्थासाठी भेदाभेद करून श्रेष्ठत्व मिरवीत बसली. इंग्रज गेले तेव्हाच गुलामी संपली मग आता कशासाठी गुलामी हवी? ज्याचे हातावर पोट आहे तो गरीब नसून जनतेच्या पैशावर मजा मारणारेच गरीब!

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### श्रावणातील पहिला सण नागपंचमी

नागपंचमी हा श्रावण मासातील पहिला सण! हा सण श्रावण शुद्ध पंचमी या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी नागपंचमी २९ जुलै या दिवशी आहे. या दिवशी स्त्रिया उपवास करतात, नवीन वस्त्रे, अलंकार परिधान करून नागदेवतेची पूजा करतात आणि त्याला दुधाचा नैवेद्य दाखवतात. नागदेवतेचे पूजन केल्यामुळे सर्पभय उरत नाही आणि विषबाधा होण्याचे संकट टळते. नागपंचमीच्या दिवशी भाजी कापणे,



चिरणे, तळणे, तसेच भूमी उकरणे, नांगरणे यासारख्या कृती करणे निषिद्ध आहे; या मागचा उद्देश नागपंचमीच्या दिवशी चुकूनही नागाला इजा पोहोचू नये हा आहे. सर्प किंवा नागदेवता हे शेतकऱ्यांचे मित्र आहेत. कारण ते शेतीतील पिकांचे, उपद्रवी प्राणी, कीटकांपासून रक्षण करतात.

स्त्रियांनी नागाच्या आकृत्यांचे भावपूर्ण पूजन केल्याने नागदेवता प्रसन होतात आणि शक्ती मिळते. नागपंचमीच्या दिवशी बहिणीची हाक ईश्वराच्या चरणी पोहोचते. त्यामुळे बहिणीने भावाच्या उन्नतीसाठी ईश्वराला प्रार्थना करावी आणि सुख समृद्धीचा आशीर्वाद मिळवावा. पूर्वीच्या काळी माहेरवाशिणी माहेरी यायच्या. शेतातील वारुळाची पूजा करायच्या. नागपंचमीपासून झाडाला दोरी बांधून श्रावण महिनाभर मैत्रिणींसोबत झोके घेत निसर्गासोबत हिरव्यागार श्रावणाचा आनंद लुटायच्या. आता हे फक्त ग्रामीण भागात थोड्या प्रमाणात आहे. म्हणून नागपंचमी हा सण नागदेवतेप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच श्रावणातील आनंद लुटण्याचा देखील दिवस आहे.

**वर्षा आवदे**/नागपूर

### लाडक्या बहिणींच्या निधीवर भावांचा डल्ला

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेवर पुरुषांनीही डल्ला मारल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या योजनेत गैरप्रकार करून १४ हजार २१८ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेत सरकारचे २१ कोटी ४४ लाख रुपये लाटले आहेत. याआधी सरकारी कर्मचारी असलेल्या महिलांनी या योजनेचा लाभ घेऊन आर्थिक फसवणूक केल्याची बाब उघड झाली होती. सरकारची आर्थिक फसवणूक करणाऱ्या अशा महिलांवर कसलीही कारवाई झाली नाही. त्यांच्याकडून पैशांचीही वसुली करण्यात आली नाही. ही योजना गरीब महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी आहे हे माहीत असूनही यात गैरप्रकार करून सरकारची आर्थिक फसवणूक करणाऱ्या या महाभागांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कारवाई करायला हवी.

ज्या पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला त्यांच्याकडून पैशांची वसुली करायला हवी. केवळ या पुरुषांवरच नाही तर ज्या महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेत गैरप्रकार करून सरकारची आर्थिक फसवणूक केली आहे त्यांच्याकडूनही पैशांची वसुली करावी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### आनंद विद्यालयात २०० विद्यार्थ्यांना कौशल्यविकास किट वाटप

कौशल्य विकास मंत्रालयाद्वारे १४०० किट उपलब्ध

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील आनंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि.२८) २०० विद्यार्थ्यांना मोफत कौशल्य विकास किटचे वाटप करण्यात आले.

कौशल्य विकास मंत्रालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी मोफत १४०० कौशल्यविकास किट उपलब्ध झाल्या आहेत. त्यापैकी २०० कौशल्य विकास कीट येथील आनंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या वाटप करण्यात आल्या. यावेळी आयटीआय आयएमसी सदस्य व समाजभूषण प्रा. सौ. रमाताई शेजावळे, तसेच कौशल्य विकास मंत्रालयाचे नांदेड येथील समन्वयक सचिन नरंगाळे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या शेळके होत्या. मुख्याध्यापक श्रीधर कोके, तसेच विद्यालयातील शिक्षकवृंद, विविध मान्यवर आणि विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती कार्यक्रमात होती.

कार्यक्रमात भालचंद्र गोरे, प्रभावती अन्नपूर्वे, रूपाली ठाकरे, मनीषा जाधव, संतोष जाधव, भागवत भरोसे सर, बाळासाहेब कदम सर, ठोंबाळ सर, शिरसाट सर, शिंदे मॅडम, खूपसे मॅडम, बेंद्रे सर, प्रवीण गायकवाड सर, पांडुरंग भरोसे, चकोर सर, राऊत सर, डाके सर, आढे सर, झाडे सर यांचाही उपस्थितीत सहभाग होता.

या उपक्रमांतर्गत उर्वरित किट येत्या आठवड्यात परभणी शहरातील विविध महाविद्यालयांमध्ये वितरित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून, आधुनिक शिक्षणाची साधने उपलब्ध करून देणारा उपयुक्त टप्पा आहे. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत प्रेरणा दिली.

### चित्रकला स्पर्धेत विविध गटात आरुष माळोदे, आर्या काळे, प्रितेश खरवडे व संहिता नाईक प्रथम

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त परभणी शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या भव्य चित्रकला स्पर्धेत विविध गटात आरुष माळोदे, आर्या काळे, प्रितेश खरवडे व संहिता नाईक यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

ही भव्य चित्रकला स्पर्धा पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष व प्रथम महापौर प्रतापभैय्या देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार २७ जुलै रोजी सकाळी १० ते १ दरम्यान एमआयडीसीतील व्यंकटेश मंगल कार्यालयपार पडली. या स्पर्धा दोन गटांमध्ये-५ वी ते ७ वी (लहान गट) आणि ८ वी ते १० वी (मोठा गट)-मुला-मुलींना स्वतंत्र ठेवून आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धे ला परभणी शहर व परिसरातील सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मोठ्या गटातील मुलांमध्ये प्रथम क्रमांक आरुष सुनिल माळोदे (५१००), द्वितीय अद्वैत अविनाश कंधारकर (३१००) व तृतीय ओंकार गणेश लांडगे (२१००) यांनी पटकावले. मुलींमध्ये प्रथम क्रमांक आर्या नरहरी काळे, द्वितीय मृणाल मुरलीधर देशमुख आणि तृतीय सिद्धी हनुमान रणेर यांनी मिळवला. तसेच लहान गटातील मुलांमध्ये प्रथम प्रितेश जगनाथ खरवडे, द्वितीय अतुल जाधव व तृतीय आत्मज रंजिता चांदविले हे ठरले. तर मुलींच्या गटात प्रथम संहिता प्रवीण नाईक, द्वितीय अदिती शिवानंद जमसेटे आणि तृतीय समृद्धी लक्ष्मणराव गारकर यांनी बाजी मारली.

स्पर्धेत मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांचाही सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला. त्यांच्यासाठी स्वतंत्र सन्मान ठेवण्यात आले होते. प्रथम क्रमांक अभिषेक चंदू गवारे, द्वितीय शिवकन्या बंडू चापके आणि तृतीय अश्विनी नागोराव खिलारे यांना प्रदान करण्यात आले. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेतील विजेत्यांना प्रतापभैया देशमुख, ज्ञानेश्वर नाटकर, नंदाताई राठोड, रोहन समाले, संजय कदम, शंकर भागवत, दीपक वारकरी, राजेंद्र वडकर, नगरसेवक पंजाब पतंगे, राजू शिंदे, बबन मुळे, चांदुराम बोराडे, बबन मकासरे आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. रामेश्वर आवरगंड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुदाम तूपसुंदरे यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुरेश काळे, सुरेंद्र रोडगे, सचिन पाचपुंजे, अनिल गोरे, सचिन सोनटके, रामदास कदम, माणिक भद्रगे, अकबर अली, मोईन खान, शमशू हाशमी, सय्यद अस्लम फौजी, विनोद कणकूटे, माही दांडगे, विनोद खरात, विजय धरणे, विजय काळे, रामभाऊ भवर, संकेत वाकले, वैभव शिंदे, सुरेश प्रधान, माणिक अशोले, शेख इकबाल दावत, किरण लोखंडे, साजिद भाई, विद्या जोंधळे, महादेवी स्वामी, प्रभा हटकर यांचे विशेष योगदान लाभले.

### कपाशी पिकात आकस्मिक मरचं संकट; तातडीने उपाययोजना करण्याचे कृषी विद्यापीठाचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणीसह मराठवाड्यात मोठ्या खंडानंतर पडलेल्या पावसामुळे अनेक शेतांमध्ये कपाशीच्या झाडांना आकस्मिक मर येण्याचे प्रकार वाढले असून, यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता पसरली आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रामार्फत या समस्येवर तातडीने लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ डॉ. जी. डी. गडदे, डॉ. डी. डी. पटाईत व एम. बी. मांडगे यांनी सांगितले की, आकस्मिक मर ही आहेत.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❏ दैनिक ❏ वेबसाईट ❏ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# गळक्या व मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्यात विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जन

**साळेगाव येथील जिल्हा परिषद शाळातील प्रकार, प्रशासनाचे दूर्लक्ष विद्यार्थ्याच्या जिवावर बेतू शकते**

**शिवाजी आकात**

**सेलू/प्रतिनिधी-** गळक्या व मोडकळीसतालूक्यातील साळेगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या वर्ग खोल्या मोडकळीस आल्या असून या वर्ग खोल्या पावसामूळे गळत असल्याने या धोकादायक वर्ग खोल्यात विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करावे लागत असल्याची वास्तव परिस्थिती आहे.तालूक्यातील साळेगाव येथे जिल्हा परिषदेची इयत्ता १ ते ७ वी पर्यंत प्राथमीक शाळा आहे.

या साळेत एकूण ८९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत एकूण मूख्याध्यापक कार्यालयासह ४ वर्ग खोल्या आहेत मात्र या चार पैकी तीन वर्ग खोल्या मोडकळीस आल्या असून मूख्याध्यापक कार्यालयाच्या वर्ग खोलीच्या भिंतीस जागोजागी तडे गेले आहेत.सदरिल वर्ग खोली पडण्याची भिती असली तरी पावसामूळे या वर्ग खोलीत विद्यार्थ्यांना बसवावे लागत आहे.तसेच पावसाचे पाणी वर्ग खोल्यात साचत असल्याने विद्यार्थ्यांना





वर्ग खोल्यात बसत येत नाही तर विद्यार्थ्यांना व्हरांड्यात बसून ज्ञानार्जन करावे लागत आहे .दरम्यान अनेक वेळा प्रशासनाकडे वर्ग खोल्या दूरूस्ती बाबत लेखी निवेदने दिली असली तरी सूद्धा सदरिल शाळेच्या वर्ग खोल्या दूरूस्त करण्यात आल्या नसल्याने नाईलाजास्तव विद्यार्थ्यांना पावसाळ्यात व्हरांड्यात बसून शिक्षण घ्यावे लागत आहे.दरम्यान या सर्व प्रकाराकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

प्रशासनाचे दूर्लक्ष

वर्ग खोल्या संदर्भात मागील अनेक वेळा जिल्हा परिषद व शिक्षण विभागाकडे अर्ज केले आहेत अनेक वेळा प्रस्ताव मागविले आहे मात्र प्रत्यक्षात प्रशासनाकडून शाळा दूरूस्ती संदर्भात कूठलेही ठोस पाऊल उचलले नाही यामूळे पावसाच्या दिवसामध्ये शाळेच्या वर्ग खोल्यात पाणी साचून विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यात बसण्यासाठी अडचणी येत आहेत.लवकर यासाठी पर्यायी व्यवस्था होणे गरजेचे आहे नसता गटशिक्षण अधिकारी कार्यालयात विद्यार्थ्यांचे वर्ग भरविण्यात येतील.विद्यार्थ्याच्या जिवाशी खेळ चालविला जात असून या सर्व प्रकारास प्रशासन जबाबदार आहे.
-सूरेखा आकात-
उपाध्यक्षा

### सोमवारी परभणीत पावसाची विश्रांती

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरात पावसाने गेल्या दोन ते तीन दिवसापासून उघडदीप दिली आहे. त्यामुळे शेतकरी तसेच सामान्य नागरिक यामुळे परेशान झालेला दिसत आहेत. सध्या पावसाची मोठी आवश्यक ता आहे. त्यातच यावर्षी पावसाने उशिरा आपली हजेरी लावली होती. तसेच मे महिना पूर्ण पावसाने आपले आगमन केले होते. त्यानंतर मात्र पावसाने चांगलीच उघडदीप दिली यामुळे सर्व वातावरणात कमालीचा उकाडा निर्माण झाला होता. त्याचा परिणाम यावर्षी पावसावर झाला आहे.

## पक्षप्रवेश सोहळ्यातून वरपुडकर आज जोरदार शक्तीप्रदर्शन करणार

**परभणीतून शेकडो गाड्याच्या ताफ्यानिशी हजारो कार्यकर्ते मुंबईस रवाना : भाजपाच्या प्रदेश कार्यालयात दुपारी ३ वाजता पक्षप्रवेश सोहळा**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** पक्षप्रवेश सोहळ्यातून वरपुडकर जोरदार शक्तीप्रदर्शन करणार आहेत.

परभणीतून शेकडो गाड्याच्या ताफ्यानिशी हजारो कार्यकर्ते मुंबईस रवाना : उद्या भाजपाच्या प्रदेश कार्यालयात दुपारी ३ वाजता पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आलेले आहे.

दरम्यान परभणी जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री, जिल्हा काँग्रेस कमिटीचे विद्यमान अध्यक्ष तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे विद्यमान अध्यक्ष सुरेश वरपुडकर हे मंगळवारी (दि.२८) मुंबईत हजारो समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणार आहेत. विशेषतः या पक्षप्रवेश सोहळ्यातून वरपुडकर हे जोरदार शक्तीप्रदर्शन करणार आहेत.

ज्येष्ठ नेते वरपुडकर यांच्या पक्षप्रवेशास भारतीय जनता पार्टीच्या श्रेष्ठींनी हिरवा कंदिल दिल्याबरोबर वरपुडकर यांनी शहरासह जिल्ह्यातील त्यांचे पदाधिकारी व समर्थक कार्यकर्त्यांबरोबर गेल्या दोन-चार दिवसांपासून हितगूज करीत पक्षांतराबद्दल माहिती दिली. त्यावेळी बहुतांशी समर्थकांनी त्यांच्या पक्षांतराच्या निर्णयास भक्कम असे समर्थन जाहीर केले. तर बहुतांशी पदाधिकाऱ्यांनी आपण स्वतः या सोहळ्यास हजेरी लावून भाजपात प्रवेश करु, अशी ग्वाही दिली. त्यामुळे वरपुडकर यांनी मोठ्या उत्साहाने पक्षांतराच्या या सोहळ्यातून जोरदार शक्ती प्रदर्शन व्हावे, या संदर्भात निर्णय घेतला. अन् पाठोपाठ शहरासह ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांबरोबर हितगुज करीत व्युहरचना आखण्यास सुरुवात केली.

त्याप्रमाणे सोमवारी सकाळी विष्णू नगरातील वरपुडकर यांचे निवासस्थान समर्थकांच्या गर्दीने अक्षरशः फुलले. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मुख्य शाखेसमोरसुध्दा समर्थकांनी मोठी भाऊगर्दी केली.

### पूर्णेत झालेल्या जोरदार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी

**पूर्णा,प्रतिनिधी-** पूर्णा शहर व परिसरात कालपासून जोरदार पाऊस सुरू झाल्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे.या पावसामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे .पूर्णा तालुक्यात मागील काही दिवसापासून पावसाने दांडी मारल्यामुळे



शेतकरी राजा चिंताग्रस्त झाला होता परंतु मागील दोन दिवसापासून पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे शेतातील पिकांना मोठे जीवदान मिळाले या पावसामुळे शेतातील पिके उभरणार असून काल सकाळ पासून पूर्णा शहर व तालुक्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.शनिवारी दिवसभर पावसाची रिमझिम चालूच होती रोजप्रमाणे सूर्यदर्शन झाले नाही.जोराच्या पावसामुळे अनेक भागात पाणी साचले आहे तसेच तालुक्यातील पूर्णा माटेगाव पुलावरील मोठ्या प्रमाणात पाणी आले आहे.माटेगाव पुलावरून पाणी जात असल्यामुळे पूर्ण झिरो फाटा परभणी रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला आहे.



**सेलू- महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर उपोषण सुटले माजी आमदार हरिभाऊ लहाने यांची मध्यस्ती झाल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले होते. यावेळी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी आदी दिसत आहेत.**

# हुमणीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे नुकसान; टाकळखोपा ग्रामपंचायतीकडून तहसीलदारांना मदतीसाठी निवेदन सादर

**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यातील टाकळखोपा (श्रीरामवाडी) या शिवारात हुमणी कीटकाच्या प्रचंड प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर टाकळखोपा ग्रामपंचायतीतर्फे तहसीलदार कार्यालय, जिंतूर येथे शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी यासाठी दि. २५ जुलै रोजी माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे यांच्या उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले.

गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सोयाबीन, तूर आणि कापूस यासारखी पिके घेतली होती. मात्र हुमणी कीटकांच्या प्रकोपामुळे सुमारे २०० हेक्टरवर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांपुढे गंभीर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे व गावातील सरपंच सौ.अनुसया भीमराव श्रीरामे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतीने सादर केलेल्या निवेदनात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सदरच्या




निवेदनात करण्यात आली आहे. शासनाने तातडीने लक्ष घालून पंचनाम्याची कार्यवाही करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी ग्रामस्थ शेतकऱ्यांनी केली आहे.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे, शेतकरी दगडु रावघुगे, रावसाहेब घुगे, विश्वनाथ घुगे, नारायण श्रीरामाचे, पांडुरंग श्रीरामाचे, देवाबा दळवे, मारोतराव दळवे, मारोतीराव घुगे, गुलाब पवार, संतोष राठोड, अशोक राठोड, दिलीप जाधव, मंगेश घुगे, ज्ञानोबा घुगे, जेनार्दन घुगे, रावसाहेब मानकरी, दिलीप घुगे, संतोष घुगे, शामराव घुगे, गजानन घुगे, जेगनलि घुगे, अमोल घुगे, कृष्णा घुगे, सुभाष राठोड, देविदास वाघमारे, गजानन घुगे, वसंत गिते, शरद घुगे, सचिन सांगळे, गोपी जाधव, भास्कर पवार, दसरथ वाव्हळ, गणेश देवला, बळीराम वाव्हळ, वामन घनसावत, गजानन माने, साहेबराव लिंगायत, पांडुरंग कुटे, रामकिशन चाटे , ज्ञानेश्वर चाटे, कैलास मानकरी, आजारांवर घुगे, बाबाराव घुगे, रामप्रसाद घुगे, रंगनाथ घुगे, एकनाथ घुगे, नितीन घुगे, साहेबराव राठोड, माधव वाघमारे, गजानन घुगे, गेणेश राठोड, जेगन घुगे, कैलास वाव्हळ, सतिश वाव्हळ, आक्षोबा घुगे, पिराजी घुगे, मदन घुगे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रीडा प्रबोधिनीतील मुलींचा विनयभंग करणाऱ्या व्यवस्थापकाला बडतर्फ करा- नंदा पवार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील जिल्हा परिषदेच्या क्रीडा प्रबोधिनीतील मुलींचा विनयभंग करणाऱ्या व्यवस्थापकास सेवेतून बडतर्फ करून त्याच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी जालना जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा नंदा पवार यांनी केली आहे.

यासंदर्भात नंदा पवार यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने अप्पर जिल्हाधिकारी रीता मैत्रेवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जालना येथील रेल्वे स्टेशन रस्त्यावर जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात निवासी क्रीडा प्रबोधिनी मुलींचे वसतिगृह आहे . क्रीडा प्रबोधिनी वसतिगृहातील व्यवस्थापकांनी तिथल्या मुलींसोबत वारंवार अश्लील चाळे करत त्यांचा विनयभंग केला आहे,गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून वसतिगृहाचे व्यवस्थापक प्रमोद खरात यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या वसतिगृहातील भौतिक सुविधांसह वसतिगृह व्यवस्थापकाच्या कारभाराबाबत गंभीर स्वरूपाच्या तक्रारी प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या.या तक्रारीच्या अनुषंगाने जालना पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांनी महिला केंद्रप्रमुख सुजाता भालेराव यांना सोबत दोन दिवसांपूर्वी वसतिगृहाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी अनेक मुलींनी व्यवस्थापक प्रमोद गुलाबराव खरात याच्याकडून होत असलेल्या गैरवर्तनाच्या गंभीर तक्रारीचा पाढाच वाचला.खरात हा मुलींना सीसीटीव्ही कॅमेरे नसलेल्या रूममध्ये नेऊन छाती, पोट, पाठ व गळ्यावरून हात फिरविण्यासारखे अश्लील वर्तन करीत असल्याच्या अनेक तक्रारी करण्यात आल्या.

वसतिगृहात महिला प्रशिक्षक उपलब्ध असतांना देखील खरात याने एका मुलीची छाती मोजली होती, सदर मुलगी याप्रकाराने प्रचंड घाबरली होती. त्यावेळी खरात याने कोणाला सांगू नको, म्हणून दमदाटी केली होती.

मुलींसोबत वारंवार अश्लील वर्तन करणाऱ्या खरात याच्या संदर्भातील तक्रारीची गंभीर दखल घेत रविवारी रात्री गटशिक्षण अधिकारी मनोज कोल्हे यांनी फिर्याद दाखल केली आहे. तरीही पुन्हा असल्या प्रकारचे गंभीर प्रकार होऊ नये यासाठी क्रीडा प्रबोधिनी वसतिगृहातील व्यवस्थापक प्रमोद खरात यांला सेवेतून बडतर्फ करण्यात यावे व त्याच्यावर कठोर कारवाई करावी, नसता महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांनो, जनावरांना कुठं घेऊन जाल? पारध बुद्रुकचा दवाखाना स्वत:च आजारी!

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**



जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील पारध बुद्रुक येथील पशुवैद्यकीय दवाखाना सध्या अत्यंत बिकट अवस्थेत आहे, ज्यामुळे परिसरातील पशुधनाचे आरोग्य धोक्यात आले आहे. पावसाळ्यात या दवाखान्याचा आणि समोरील परिसराचा अक्षरशः चिखलाने आणि पावसाच्या पाण्याने ताबा घेतला आहे. यामुळे दवाखान्याकडे जाण्याचा मार्गच बंद झाल्याने जनावरांना उपचारासाठी आणणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. दवाखान्याच्या आतही परिस्थिती फार वेगळी नाही. स्लॅबमधून पावसाचे पाणी ठिबकत असल्याने जागोजागी तडे गेले आहेत. यामुळे केवळ भिंती खराब होत नाहीत, तर उपचार घेण्यासाठी येणाऱ्या जनावरांना आणि त्यांच्या मालकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो आहे. या दयनीय परिस्थितीमुळे अनेक शेतकरी आपल्या जनावरांना या दवाखान्यात आणण्यास धजावत नाहीत. परिणामी, पशुधनाच्या उपचारासाठी शेतकऱ्यांना खासगी डॉक्टरांवर अवलंबून राहावे लागत आहे, ज्यामुळे त्यांचा आर्थिक भार वाढत आहे. पशुधनाच्या आरोग्यासाठी अत्यंत गंभीर असलेल्या या परिस्थितीकडे शासनाने आणि संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या दुरुस्तीसाठी योग्य उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे परिसरातील पशुधन आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

## संक्षिप्त



मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्त्वावर ठाम विश्वास ठेऊन आणि भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली पारेगाव येथील काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते श्री.नितीन कानडे आणि पीर पिंपळगाव येथील श्री.पांडुरंग कोल्हे यांनी भाजपात प्रवेश केला यावेळी त्यांचे भाजपा मध्ये हार्दिक स्वागत करत शुभेच्छा दिल्या.या प्रवेशप्रसंगी वसंत काका शिंदे, मुकेश चव्हाण, पांडुरंग क्षीसागर, आणि सतीश जारे उपस्थित होते.

# घरकुलाच्या अनुदानासाठी लाभार्थ्यांना मारावे लागत आहेत पंचायत समितीत हेलपाटे!

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड पंचायत समिती म्हणजे सर्वसामान्य लोकांचें सर्वांगीण विकासाचे मुख्य कार्यालय असून सर्वसामान्य विकासात्मक कामे याचं कार्यालय मार्फत राबविली जातात मग ती घरकुल योजना असो की रोजगार हमी योजना तसेच दलित वस्ती सुधार योजना किंवा पाणी पुरवठा योजना असोत स्वच्छता अभियान, शेतकऱ्यांसाठी कृषि विभाग अशा अनेक ग्रामीण भागातील लोकांसाठी योजना शासनाच्या

कडून पंचायत समिती या कार्यालय अंतर्गत राबविल्या जातात मात्र अंबड पंचायत समितीचा अजब गजब कारभार कैसे अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहत नसून आरामशीर शाही थाटात येतात साडे अकरा ते बारा वाजता त्यांचे काय भांड में जाये जनता काम आपणा बनता अशा म्हणीप्रमाणे अंबड पंचायत समितीचे काम होत असल्याचे चित्र दिसत आहे.

आवास योजनेच्या लाभार्थ्यांना हप्त्याची अडवणूक करून संबंधित अभियंता इंजिनिअर घरकुलाचे हप्ते टाकण्यासाठी लाभार्थ्यांकडून घेतात पैसे मग खेड्या पाड्यातील घरकुल लाभार्थी मारतात चकरावर चकरा संबंधित अभियंता चा लागत नाही मेळ त्यात मग करतात काढू पणा वेळ त्या लाभार्थ्यांला चालढकल करत फिरवा फिरवी करत असून अंबड पंचायत समिती मध्ये चालू असलेल्या मनमानी कारभारामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अनेक दिवसांपासून या चालू असलेल्या भोंगळ कारभाराला नागरिक प्रचंड वैतागले आहेत याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष देतील का ? असा सवाल सामान्य जनतेतून उपस्थित

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील केंद्रीय प्राथमिक शाळा तळणी येथे शिवसेना पक्ष प्रमुख माजी मुख्यमंत्री मा उद्धवजी साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला यावेळी मनोगत मंठा तालुका संघटक ज्ञानेश्वर माऊली सरकटे माननीय पक्ष अध्यक्ष शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचण्यात आले पाहिजे व उद्धव साहेब ठाकरे यांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याची माहिती दिली शिवसेना पदाधिकारी यांचे सत्कार करण्यात आले व शालेय मुलांना वही पेन वाटप करण्यात आले यावेळी शिवसेना तालुका संघटक ज्ञानेश्वर माऊली सरकटे युवा सेना उप जिल्हा प्रमुख संदीप भैया सरकटे युवा उप तालुका प्रमुख आवेश पठाण सदाशिव लाड संतोष सरकटे सुखदेव हनवते गजानन पातळे भागवत कंबळकर भागवत सरकटे ज्ञानेश्वर येऊल जुनेद बागवान ऋषी देशमुख साबेर शेख प्रज्वल पन्हाळकर ओम हानवतेराहुल भारस्कर तनवीर पठाण विशाल हानवते व इतर युवा सेना कार्यकर्ते शिक्षक शिंदे सर वराडे सर राठोड सर इंगळे सर शिरसाट सर धारतकर सर उपस्थित होते सूत्र संचालन गरोळे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन आवेश पठाण यांनी केले.

# रफिक कॉलनीत नागरीकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

शहरातील रफिक कॉलनी भागातील नागरिकांच्या वतीने नव्याने रुजू झालेले मुख्याधिकारी गजानन तायडे यांना निवेदन देऊन या भागात कायमस्वरूपी मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले की , रफिक कॉलनी या भागात नगर परिषद कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या आवश्यक सुख सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यापासून यामध्ये नाल्या, पाईपलाईन, विद्युत खांब, गटारे आदी प्रकारच्या कुठल्याही सुविधा देण्यात आलेल्या नसून व आमच्या परिसरात या सुविधा उपलब्ध नसल्याने तसेच काही ठिकाणी नाल्या देखील नसल्याने सदरील अजून सांडपाणी हे पाणी हे नाल्या नसल्याने रस्त्यावरच डबके साजतय, व सदरील साचलेल्या पाण्यामध्ये डासांची तसेच मच्छरांची उत्पत्ती होऊन लहान मुलांचे तसेच नागरिकांच्या



आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून या भागातील रफिक कॉलनीतील म्हाडा रोड शेख एजाज यांच्या घरापासुन ते शेख कुद्दुस सर यांचे घरापर्यत ७ मिटर नाली बांधकाम करण्यात यावे.नाल्याचे, गटारे तसेच विद्युत सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्या नसता आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा या वेळी घेण्यात आला आहे, या निवेदनावर निवेदनावर अब्दुल कुद्दुस,शेख सरफराज,शेख युनूस, कुद्दुस इकबाल,शेख अयाज, इद्रिस भाई,रहीम भाई, आरिफ खा,शेख जावेद,अब्दुल कादर, कमर शाह,अक्रम कुरेशी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कोकाटेंचा राजीनामा तसेच घाडगे पाटलांच्या मारहाणीच्या निषेधार्थ भोकरदन येथे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

विधानभवनात रम्मी खेळणाऱ्या कृषी मंत्र्याचा तात्काळ राजीनामा घ्यावा तसेच अ.भा.छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे पाटील यांना अमानुष मारहाण करणाऱ्या गुंड सुरज चव्हाण व त्याच्या साथीदारांवर ३०७ प्रमाणे फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच अ.भा.छावा संघटनेचे जिल्हाअध्यक्ष संदिप ताडगे पाटील व इतर पदाधिकार्यांवर जाणीवपुर्वक दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मांगे घेण्यात यावे या प्रमुख मांगण्यासाठी अ.भा.छावा संघटना व विविध पक्षाच्या वतीने तारीख २८ सोमवार रोजी सकाळी ११ वाजता येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन करण्यात आले, या आंदोलनात विविध संघटनेच्या कार्यक्रत्यांसह इतर संघटना व शेतकर्यांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती.

यावेळी प्रथम छत्रपतीच्या अश्वारूढ स्मारकास अभिवादन करत या आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. आंदोलनात कृषीमंत्र्याच्या विरोधात घोषणाबाजी करत त्यांचा राजीनामा तात्काळ घेण्यात यावा असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेत सुरज चव्हाणवरही कठोर कारवाई करण्यात यावी अशी मांगणी केली. कृषीमंत्र्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी पत्त्यांची माळी आंदोलकांनी गळ्यात घालत प्रतिकात्मक निषेध केला. या आंदोलनात छावा संघटनेचे मराठवाडा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष दत्ता ठाले,तालुका अध्यक्ष विष्णु गाढे,उपाध्यक्ष अंकुश साबळे विद्यार्थी आघाडी ता.अध्यक्ष सुनिल सिरसाट,शहराध्यक्ष नंदकिशोर जाधव,ता.प्रसिद्धीप्रमुख अप्पासाहेब जाधव,फिरोज शेख,कारभारी साबळे आदी संघटनेच्या पदाधिकार्यांची उपस्थीत होती. छावा संघटनेच्या या आंदोलनास स्वराज्य संघटनेचे जिल्हाप्रमुख विकास जाधव, आनंदा कानडे, नारायण सोन्नी, काँग्रेसचे जिल्हाअध्यक्ष राजाभाऊ देशमुख,ता.अध्यक्ष त्रिंबक पाबळे युवक जिल्हाध्यक्ष राहुल देशमुख, आम आदमी पक्षाचे जिल्हाअध्यक्ष बोरशे गुरुजी,उबाठाचे शहरप्रमुख महेश पुरोहीत, आदी पक्षाच्या पदाधिकार्यांनी उपस्थीत राहत पाठिंबा दिला. सह छावा संघटनेचे कार्यकर्ते योगेश गावंडे,नामदेव घारे,पंजाबराव गावंडे,सुनिल मगर,वैजिनाथ पांढरे,विश्वास गावंडे,नारायण सहाने,किशोर राऊत,संजय सरोदे,सुनिल साबळे,समाधान रेंढे,फकिरा बोडखे, आदींसह शेतकर्यांची उपस्थीती होती.

# भक्तीपूर्ण वातावरणात आ.बबनराव लोणीकरांचे शंभू महादेवाचे दर्शन, भाविकांना दिल्या श्रावणाच्या शुभेच्छा

**महंत भागवत गिरी महाराज, महंत बालक गिरी महाराज यांच्या उपस्थितीत आ.लोणीकरांनी केली शंभू महादेवाची महाआरती**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

माजी मंत्री व आमदार श्री. बबनराव लोणीकर यांनी दिनांक २८ जुलै २०२५ रोजी दुपारी १:०० वाजता श्रीक्षेत्र शंभू महादेव, तालुका व जिल्हा जालना येथे भक्तीभावाने शंभू महादेवाचे दर्शन घेतले. या प्रसंगी त्यांनी श्रावण महिन्याच्या पवित्र वातावरणात भगवान शंभू महादेवाची मनोभावे आरती केली, ज्यामुळे उपस्थित भक्तांमध्ये श्रद्धा आणि भक्तीचा उत्साह संचारला. यावेळी श्री. अमित देशमुख यांच्या वतीने आयोजित भंडारा कार्यक्रमात श्री. लोणीकर यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यांनी स्वतःच्या हाताने महाप्रसादाची टोपली घेऊन भाविकांना प्रसाद वाटप केला, ज्यामुळे त्यांचा भक्तांशी असलेला स्नेह आणि आपुलकी दिसून आली. या कृतीने उपस्थित भक्तांमध्ये आनंद आणि आदराचे वातावरण निर्माण झाले. शिवाय, श्री. लोणीकर यांनी उपस्थित भक्तांना पवित्र श्रावण महिन्याच्या आणि श्रावणी सोमवारच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनी श्रावण महिन्याचे महत्त्व आणि श्रावणी सोमवारचे धार्मिक महत्त्व याबाबत भाविकांशी संवाद साधला, ज्यामुळे सर्वांना या पवित्र काळात भक्ती आणि अध्यात्मात अधिक रमण्याची प्रेरणा मिळाली. हा कार्यक्रम श्रीक्षेत्र शंभू महादेव येथील धार्मिक आणि सामाजिक एकतेचे प्रतीक ठरला, ज्यामध्ये श्री. बबनराव लोणीकर यांच्या सहभागाने भक्ती आणि सेवेचा संगम दिसून आला. २८ जुलै २०२५ रोजी श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी गोळेगाव ते श्री क्षेत्र शंभू महादेव कावड यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. परतूर तालुक्यातील गोदावरी नदीचे शुद्ध जल भाविकांनी कावडीत भरून भगवान शंभू महादेवावर रुद्राभिषेकासाठी अर्पण केले. ही यात्रा लोणी, आष्टी, दैठना, श्रीष्टी, परतूर, वाटूर आणि गोसावी पांगरी मार्गे शंभू महादेव मंदिरापर्यंत गेली, जिथे भजन-कीर्तन आणि ढोल-ताशांच्या गजरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी परतूर पासून वाटूर पर्यंत तर माजी मंत्री आणि परतूरचे आमदार बबनराव लोणीकर यांनी गोसावी पांगरीपासून पायी सहभाग घेऊन आपली भक्ती आणि स्थानिकांशी नाळ दाखवली, ज्यामुळे यात्रेचा उत्साह द्विगुणित झाला.



समारोप प्रसंगी मंदिरात विशेष पूजा, रुद्राभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन झाले, ज्यात परिसरातील अनेक गावांमधील भाविक सहभागी झाले. ही यात्रा भक्ती, सामाजिक एकता आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करणारी ठरली. या वेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, परतुर भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, संपत टकले, सावता काळे, नारायण लांडगे, ओमकार माने, अर्जुन जगताप, संभाजी घनवट, सोनू घनवट, नारायण लांडगे, पृथ्वी अंभोरे, अविनाश कुलकर्णी, गोपी ठाकूर, सुनील काळे, महेश पवार, बाळासाहेब चव्हाण, रामेश्वर चव्हाण, राम चव्हाण हे उपस्थित होते.

# निसर्गोपचार अभ्यासक्रम परीक्षेत लखन राठौर याचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना येथील लखन राठौर यांनी भारत सरकारच्या आयुष मंत्रालयामार्फत चालविल्या जाणाऱ्या निसर्गोपचार अभ्यासक्रम परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे. पुणे येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी या संस्थेतून लखन राठौर यांनी ट्रीटमेंट असिस्टंट ट्रेनिंग कोर्स हा कोर्स प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केला आहे. या यशाबद्दल संस्थेच्या संचालिका प्रा. डॉ. के. सत्यलक्ष्मी आणि डॉ. मंदार देशपांडे यांच्या हस्ते राठौर यांना प्रमाणपत्र प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. या एक वर्षाच्या अभ्यासक्रमात निसर्गोपचाराच्या विविध पद्धती जसे की मालिश थेरपी, ॲक्युप्रेशर, जलचिकित्सा (वॉटर थेरपी), मृत्तिकाचिकित्सा (मड थेरपी), योग, उपवास, संतुलित आहार, क्रोमो थेरपी, मॅग्नेट थेरपी, फिजिओथेरपी व फिटनेस यांचा समावेश होता. याशिवाय शरीरशास्त्र, शरीरक्रियाशास्त्र आणि निसर्गोपचार तत्त्वांचे सखोल शिक्षणही देण्यात आले. या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त लखन राठौर यांनी विविध उपक्रम आणि स्पर्धांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. प्रजासत्ताकदिनी देशभक्तीपर नृत्य, महिला दिनी नारी जागरण गीत, स्वातंत्र्यदिनी देशशक्ती गीत सादर केले. गांधी जयंतीनिमित्त रस्ते स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. योग दिन आणि जागतिक ध्यान दिनी योग संगीताचे सादरीकरण केले. याशिवाय, पर्यावरण दिनानिमित्त निबंध व भाषण स्पर्धेत प्रथम क्रमांक, वादविवाद स्पर्धेत दुसरा क्रमांक आणि काव्य स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला. अभ्यासक्रमाच्या समारोप समारंभाचे सूत्रसंचालन आणि समन्वयाची जबाबदारीही राठौर यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

# न्यायालयाच्या आदेशाचे सरकारने कठोर अंमलबजावणी केल्यास दलित आदीवासी भूमिहीन कास्तकराचे कास्तपट्टे नियमानूकुलित होतील -ॲड.भास्कर मगरे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर अंमलबजावणी केल्यास दलित आदीवासी भुमिहीन कास्तकरांचे कास्तपट्टे नियमानुकूलित होतील आणि धनदांडग्यांचे बेकायदेशीर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्काशित होईल असे प्रतिपादन शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाध्यक्ष ॲड. भास्कर मगरे यांनी येथे केले. ते सोमवार (दि २८) रोजी बदनापूर येथे शिवसेना दलित आघाडीच्या तालुकास्तरीय मेळाव्यात बोलत होते.

ॲड. मगरे म्हणाले की, शिवसेना दलित आघाडी गेली अनेक वर्षांपासून जन आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष करीत आहे. मात्र, प्रशासकीय स्तरावर शासन निर्णय २८ नोव्हेंबर१९९१ अधिनियमाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे दलित आदीवासी भूमिहीन



कास्तकरांना हक्काच्या सातबारापासून वंचित रहावे लागत आहे. गावगुंडांच्या त्रासाला बळी पडून अनेक दलित आदीवासींना प्राण सुद्धा गमावावे लागले आहेत. महाराष्ट्र शासनाने मा. सवौच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केल्यास राज्यातील दलित आदीवासी भुमिहीन कास्तकारांच्या नावे होऊ शकतात. आणि राज्यातील धनदांडग्यांचे बेकायदेशीर अतिक्रमण निष्काशीत होऊ शकते. कारण शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमानुसार १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० नुसार राज्यातील दलित आदीवासी भुमिहीन कास्तपट्टे नावे करुन देण्याचे आदेश आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाचे २८ जानेवारी च्या आदेशात शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमातील तरतुदीनुसार बाकी अतिक्रमण निष्काशीत करण्याचे ज्या त्या राज्याला आदेशीत केले आहे. त्याविषयी मा. उच्च न्यायालय मुंबई सुमोटो मध्ये अंतरीम आदेशात म्हटले आहे की, २८ जानेवारी २०११ सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन महाराष्ट्र सरकार का करत नाही. आणि म्हणून महाराष्ट्र सरकारने शासन निर्णय १२ जुलै २०११ अधिनियम करुन मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन असे आदेश देत आहे की, नमुद परिच्छेद ७ (४) प्रयोजना व्यतिरिक्त प्रशासकीय स्तरावर शासन निर्णय १२ जुलै २०११ अधिनियमात तरतुद ९(२) नुसार तहसीलदार मनमानी करुन दलित आदीवासी भुमिहीन कास्तपट्टे बेकायदेशीर दाखवून धनदांडग्यांचे बेकायदेशीर १४ एप्रिल १९९० च्या नंतरचे अतिक्रमणाला संरक्षण देण्याचे काम करीत असल्याचे ॲड. मगरे यांनी म्हटले आहे.

यासंदभाने रामनगर येथील गटनं २०० गायरानमधील रिसतर आणि कायदेशीर मार्गाने मा. उपविभागीय अधिकारी जालनायांचेकडील अपिलातील लाभार्थी वगळून वाटेल त्या लाभार्थ्यांस सात बारा वाटप कला आहे. ज्यांनी पैशाचा व्यवहार केला त्यांना घरी बोलावून सात बारा वाटप केल्याचा गंभीर आरोपही ॲड. मगरे यांनी केला आहे. तर जे पैसे देत नाहीत अशांना आदेश असतांनाही सात बारा वर नोंद होत नाही. यासंदर्भात जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी जालना यांना लेखी निवेदन दिले असल्याचेही ॲड. मगरे यांनी सांगितले.

राज्य सरकारने आता या बाबींकडे लक्ष देऊन शासन निर्णयासह मा. सर्वोच्च न्यायलयाच्या आदेशाचे काटेकोर पालन करून कास्तपटे भुमिहीनांच्या नावे करुन सात बारावर त्यांची नोंद घ्यावी व धनदांडग्यांचे बेकायदेशीर असलेले अतिक्रमण निष्काशीत करावे असा ठरावही या मेळाव्यात घेण्यात आला.

यावेळी बाळराज जय खरात, पंडीत साबळे, यांच्यासह दलित आदीवासी भुमिहीन कास्तकरांची उपस्थिती होती.

# आणीबाणीत लढा देणाऱ्या व्यक्तींना वाढीव मानधन

## पात्र लाभार्थ्यांनी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जुलै**

आणीबाणी १९७५ ते १९७७ च्या कालावधीत कारावास भोगलेल्या व्यक्ती, त्यांचे हयात जोडीदारासाठी असलेल्या मानधनात शासनाने वाढ केली आहे. यासह शासनाच्या धोरणात सुधारणा केली आहे. यासंबंधीचा शासन निर्णय २७ जून २०२५ रोजी निर्गमित केला आहे. पात्र लाभार्थ्यांनी २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. त्यानंतर प्राप्त अर्जांचा विचार करण्यात येणार नसल्याचे जिल्हा प्रशासनाने कळवले आहे.

एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु. २० हजार, त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, पतीस रु. १० हजार, एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकास मासिक रु. १० हजार, त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, पतीस रु. पाच हजार मानधन अनुज्ञेय असणार आहे. मानधनासाठी अर्जदाराचे अटकेच्यावेळी किमान १८ वय असण्याची अट आणि १४ डिसेंबर २०२३ रोजीचे शासन पत्र क्र. संकीर्ण १९२२/प्र.क्र.१९७/स्वासैक-१ देखील या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आले आहे.

आणीबाणीत कारावास भोगलेली व्यक्ती ०२ जानेवारी २०१८ पूर्वी हयात नसेल, तर त्यांच्या पश्चात असलेल्या हयात जोडीदाराला (पती/पत्नी) मानधन मिळवण्यासाठी परिशिष्ट 'ब' मधील शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे लागेल. अशा प्रकरणांमध्ये मानधन मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असतील. आणीबाणी काळात कारावास भोगलेली व्यक्ती किंवा त्याची पत्नी, पती, यापैकी कोणीही एक हयात असेपर्यंतच मानधन अनुज्ञेय असेल. त्यानंतर कायदेशीर वारस मानधन किंवा थकबाकीसाठी अर्ज करू शकणार नाहीत, असे शासन निर्णयात नमूद आहे.

# चोरीचे १७ मोबाईलचा माजलगाव शहर पोलीसांनी मुळ मालकांना केले परत

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ जुलै**



माजलगाव शहर पोलीस स्टेशन हद्दीत विविध ठिकाणी नागरीकांचे मोवाईल गहाळ (हरवलेले) झाले होते. शहर पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी तपास करून १७ मोबाईल ताब्यात घेऊन ते मूळ मालकांना परत दिले.

मोबाईल चोरी झाल्याच्या तक्रारी शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्या होत्या. त्यामुळे सदर गहाळ झालेल्या मोबाईलचे शोथ करण्यासाठी पो.नि.राहुल सुर्यतळ यांनी विशेष पथकाची नेमणुक करुन एकुण १७ मोबाईलचा शोध घेवुन हस्तगत करण्यात आले. हस्तगत केलेले मोबाईल जिल्हा पोलीस अधीक्षक नवनित कॉवत यांच्या हस्ते पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे मुळ मालकांना परत केले. गहाळ झालेले मोबाईल परत मिळाल्याने मोबाईल मालकांनी पोलीस अधीक्षक व माजगाव शहर पोलीसांचे आभार व्यक्त करुण समाधान व्यक्त केले आहेत.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनित कोवत, अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके , उपविभागीय अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे, रामेश्वर खेत्रे, संतराम थापडे, महादेव बहिरवाळ यांनी केलेली आहे.

# ग्लोबल ट्रस्ट व स्थानिक लोकसहभागातून तपोवन झाले पाणीदार, नदीपात्राचे केले रुंदीकरण आणि खोलीकरण

## तपोवन सह परिसरातील गावांचा पाणी प्रश्न मिटणार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ जुलै**



शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती हे ध्येय घेऊन कार्य करणाऱ्या मयांक गांधी यांच्या ग्लोबल ट्रस्ट ने पाणीदार गावे ,पाणीदार शिवार करण्याची मोहिम हाती घेतली आहे . गोवर्धन,हिवरा ह्या गावात नदीपात्रात जलसंधारणाची कामे केल्या नंतर ग्लोबल ट्रस्ट ने प्रसिद्ध रामनाथाचे देवस्थान असलेल्या तपोवन ( ता .परळी ) येथे स्थानिक लोकसहभागातून जलसंधारणाची सुनियोजित कामे केली आहेत. तपोवन ग्रामस्थांनी सदरील कामात १५ % आर्थीक वाटा उचलत ७ लाख ५० हजार रुपये लोकसहभागातून जमा करून या ठिकाणच्या गुणवरा नदीपात्राचे रुंदीकरण आणि खोलीकरण केले आहे. पावसाचे पाणी नदीपात्रातून वाहून जावू नये यासाठी नदीपात्रात टप्प्याटप्प्यावर विशिष्ट प्रकारचे खोलीकरण करुन त्यात पाणी मुरावे असे सुनियोजन केले आहे. ह्या खोलीकरणातील पाणी अधिकाधिक जमीनीत मुरावे यासाठी नदीपात्रातील प्रत्येक ब्लॉक ठिकाणी 'रिचार्ज शाफ्ट' बोअर घेऊन त्या द्वारे जमीनीत नैसर्गिक रित्या पाणी मुरवण्याचे नियोजन केले आहे. या मुळे भूजल पातळीत जबरदस्त वाढ होणारी आहे. लाखो लिटर पाणी या ठिकाणी जमीनत मुरणार आहे. उन्हाळ्या मध्येच नदीपात्राचे काम सुरु करण्यात आले होते , गाव हद्दीतील जवळपास अडीच किमी पर्यंत नदीपात्रात खोलीकरण व रुंदीकरणाचे काम करण्यात आले आहे. नदीपात्रात ११ दिवसांपासून पाणी मुरल्या जात आहे. खोलीकरण करुन नदीपात्रात जागोजागी तयार केलेले ब्लॉकेज( मोठी खड्डे ) मधून टप्प्या टप्प्याने पाणी पुढे सरकत आहे. प्रत्येक ब्लॉकेज मध्ये 'रिचार्ज शाफ्ट' बोअर आहेत ज्या द्वारे पाणी जमीनीत जात आहे. नदीपात्रात पाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात मुरत आहे कि अजून दोन दिवस तरी पाणी गाव शिवारातील नदी बाहेर पडू शकणार नाही. या मुळे भूजल पाणी पातळी वाढून ह्या भागातील विहिर ,बोअर पाणी स्त्रोतांना पाणी वाढणार आहे आणि पाणी प्रश्न कायमचा मिटणार आहे. शेतकरी,ग्रामस्थ यांच्या मध्ये खूप आनंदाचे वातावरण आहे. हर्षोल्लासाने तपोवन ग्रामस्थांनी नदीपात्रात जाऊन जलपुजन केले. या वेळी ग्लोबल विकास ट्रस्ट चे कर्मचारी,अधिकारी उपस्थित होते.

बंधाऱ्याची खुप आवश्यकता आहे

तपोवन नदीचे रुंदीकरण/ खोलीकरण अंत्यत योग्य पद्धतीने ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेने केले .नैसर्गिक रित्या पाणी मुरवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. परंतु आता या ठिकाणी नदीपात्रात बंधारे होणे खुप आवश्यक आहे. शासन/प्रशासनाने या कडे लक्ष देऊन तपोवन च्या गुणवरा नदी पात्रात बंधारे उभारावेत अशी मागणी तपोवन ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

शेतकरी फळबागे कडे वळणार

ह्या भागातील शेतकरी ऊस ,कापुस,सोयाबीन अशी हंगामी पिके घेतात परंतु आता ग्लोबल विकास ट्रस्ट ने नदीपात्रात केलेल्या जलसंधारणाच्या कामा मुळे पावसाचे पाणी वाहून न जाता त्याच ठिकाणी मुरल्या जात आहे. या मुळे पाणी पातळीत वाढ होऊन विहिर , बोअर ह्या पाणी स्त्रोतात पाणी वाढ निश्चितच होणार आहे. शेतकऱ्यांच्या आशा आता पल्लवित झाल्या असुन हंगामी पिका बरोबर फळबाग शेती कडे तपोवन चे शेतकरी आता वळणार आहेत.

DNS
Bank Ltd. Ambajogai

# नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,
१. मे. दिग्विजय एंटरप्रायजेस प्रो. प्रा. अर्चना श्रीराम मुंडे (कर्जदार)
पत्ताः माणिक नगर, परळी (वै), ता. परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
२. श्री. वैजनाथ नामदेव आंधळे
पत्ताः- वैजनाथ नामदेव, हेळंब, ता. परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
३. श्री. प्रभाकर अंबदास देशमुख
पत्ताः- अंबदास देशमुख, टी. पी. एस. रोड, शिवाजी नगर, परळी (वै), जि. बीड:- ४३१ ५१५
४. श्री. श्रीराम (प्रभू) प्रभाकर मुंडे
पत्ताः- माणिक नगर, परळी (वै), ता. परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
५. श्री. कैलास रमाकांत मुंडे
पत्ताः- स्वाती नगर, परळी, ता. परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५
६. श्री. केशव रमाकांत मुंडे
पत्ताः- स्वाती नगर, परळी, ता. परळी (वै), जि. बीड :- ४३१ ५१५

(कायद्याच्या २(१) (f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

सिक्युरिटायझेशनच्या १३ (२) अन्वये मागणी मसुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२

महोदय,

विषयः- नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढून टाकण्याची मागणी आमची शाखाः- परळी (वै)

सुचनाः- U/S 13(2) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. पासुन तुमचे कर्जखाते दिनांक १८.०७.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेतः-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील / गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. ७०१६-३२ रु. १,००,००,०००/- | **(मालमत्ता मालकः श्री कैलास रमाकांत मुंडे आणि केशव रमाकांत मुंडे)** गहाणदार/जामीनदार श्री कैलास रमाकांत मुंडे आणि केशव रमाकांत मुंडे यांच्या मालकीचे नगर परिषद जुना घर क्र. ९२४, नवीन घर क्र. ११३२ ज्याचा सिटीएस क्र. ४४८१ मधील जुना वॉर्ड क्र. ६, नवीन वॉर्ड क्र. १०, पुर्व-पश्चिम-दक्षिण- बाजु २८'६, पुर्व-पश्चिम-दक्षिण- बाजु २९' आणि दक्षिण-उत्तर ४१ फु.एकूण क्षेत्रफळ १०९.५४ चौ. मी. म्हणजे ११७८.६५ चौ. फुट. बांधलेले व ज्या स्थितीत असेल तसे स्वाती नगर, परळी वै, जि. बीड ज्याच्या चतुःसिमा खालील प्रमाणे :- पुर्व :- सोमनाथप्पा हालगे यांचे प्लॉटींग क्षेत्र पश्चिम : मीरा किशोर काटकर यांचा प्लॉट. दक्षिण :- २० फुट रुंद रस्ता उत्तर :- लोखंडे यांचा प्लॉट. (वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत) | मुद्दल + व्याज एकुण रु.१,०३,३०,०४७/- अधिक दिनांक ३०.०६,२०२५ रोजी पुढील व्याज @ ११.८५% दिनांक०१.०७.२०२५ पासुन |

वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा. अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही.

४) घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक २९.०७.२०२१
ब.. गहाणखत नोंदणी दिनांक ०३.०२.२०१८ (गहाणखत नोंदणी क्र. २९९/२०१८)
५) म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.
६) वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कमव्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल व्याज एकुण रु.१,०३,३०,०४७/- दिनांक ३०.०६.२०२५ अधिक दिनांक ०१.०७.२०२५ पासुन पुढील व्याज @११.८५% आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक २३.०९.२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागू होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहेः
अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
(२ कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.
७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.
ठिकाणः- अंबाजोगाई

श्री. अनंत गोपाळराव देशपांडे
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह. बँक म. अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो.७६६६५७७९००

# विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास

## बळीराजाला शेती, जल व जंगल व जमिनीपासून दूर करण्याचे षडयंत्र-कॉ.एड.अजय बुरांडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ जुलै**



पर्यावरण संवर्धन करण्यापेक्षा विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास करत निसर्गाच्या सानिध्यात वावरणाऱ्या, पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनाचे बाळकडू घेतलेल्या बळीराजाला स्वतःच्या शेती, जल,जंगल आणि जमिनीपासून हुसकावून लावण्याचे षडयंत्र सत्ताधारी जन सुरक्षा विधेयकाडून करत असून या विधेयकाला शेतकऱ्यांचा देखील तीव्र विरोध होताना दिसून येत आहे. शेती, कर्जमाफी आणि पर्यावरण संवर्धन करिता तालुक्यातील नागापूर येथे सोमवार दि २८ रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व बीड जिल्हा किसान सभेकडून पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करून जन सुरक्षा विधेयकाला विरोध करण्यासाठी जोरदार निदर्शने करण्यात आली.

राज्याला संत परंपरा मोठ्या प्रमाणावर लाभलेली असून पुरोगामी विचारधारेचे संत तुकाराम महाराज यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगातून राज्यातील शेतकऱ्यांची निसर्गाप्रति, शेती आणि जंगलप्रति असलेली वास्तविक आस्था कथन केली. स्वतःच्या कष्टातुन, रक्ताचे पाणी करून बळीराजा स्वताचा उदरनिर्वाह करत पर्यावरण संवर्धन आणि जतन करण्याचे काम पूर्वापार करत आलेला असताना भांडवली, उद्योगपतीधार्जिनी व हुकूमशाही प्रवृत्ती असलेले सत्ताधारी जन सुरक्षा विधेयकाडुन सूरजगड सारख्या ठिकाणी जंगल उद्धवस्त करत जगाचा पोशिंदा असलेल्या आदिवासी व बळीराजा याना शेती,जल, जंगल आणि जमिनीपासून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत आहे. शेती आणि शेतकरी उध्वस्त करण्याचा कुटील डाव देशातील आणि राज्यातील सत्ताधारी करू पाहत असून विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास करत या कृत्या विरोधात आवाज करणाऱ्या निसर्ग व पर्यावरणप्रेमी यांचा आवाज दाबण्याचे आणि संविधान विरोधी जन सुरक्षा विधेयकाला आता जनसामान्यांचा रोष आणि संताप उघड उघड दिसून येत आहे असे प्रतिपादन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष्यांचे जिल्हा सचिव कॉ.एड.अजय बुरांडे यांनी केले.

परळी तालुक्यातील नागापूर येथे निसर्ग संवर्धन दिनानिमित्त वृक्षारोपण व जन सुरक्षा विधेयक विरोधी निदर्शने संपन्न झाली या प्रसंगी माकपचे जिल्हा सचिव कॉ.एड.अजय बुरांडे, किसान सभेचे कॉ. मुरलीधर नागरगोजे, हनुमंत सोळंके,भगवान सोळंके,दत्ता गव्हाणे, ज्ञानेश्वर सोनटक्के,गणेश सोळंके, सिद्राम सोळंके आदींसह असंख्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बरं नव्हे खरे बोला, दुष्ट, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना थारा देऊ नका-बडे

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त व्याख्यान संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ जुलै**

बरं नव्हे तर खरे बोला असे सांगत दुष्ट आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांना थारा देऊ नका असा कानमंत्र देत परळी वैजनाथ हे प्रभू वैद्यनाथांची आणि कर्तृत्ववान, प्रेमळ, धार्मिक लोकांची भूमी आहे. त्यामुळे परळीला बदनाम करण्याचे थांबले पाहिजे, यासाठी लोकप्रतिधी आणि सामान्य जनतेने पुढाकार घ्यावा असे आवाहन पत्रकार विलास बडे यांनी केले. मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिरात भविष्याची दिशा युवा शक्तीचा सन्मान या विषयावर पत्रकार विलास बडे यांचे व्याख्यान झाले.

# नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वैद्यनाथ विद्यालयात शालेय साहित्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ जुलै**

पंकजाताई मुंडे , पर्यावरण, वातावरण बदल आणि पशू संवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा उपक्रम अंतर्गत वैद्यनाथ विद्यालय परळी वैजनाथ येथे भाजपा माजी नगरसेवक महादेव इटके व भाजपा परळी यांच्या वतीने शालेय ड्रेस, वह्या व खाऊवाटप करण्यात आले.

यावेळेस भाजपा शहराध्यक्ष सौ उमाताई समशेट्टे , वैद्यनाथ विद्यालय उप मुख्याध्यापक हंगीगिरगे सर वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष श्री.विनोदजी सामत , वैद्यनाथ बँकेचे संचालक संदीप शेठ लहोटी माजी नगराध्यक्ष श्री.वैजनाथ जगतकर जेष्ठ नेते श्री.अब्दुल करीमजी, नगरसेवक पवन मुंडे, वैद्यनाथ बँकेचे संचालक अनिल तांदळे, बाळासाहेब कराळे भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव ड अरुण पाठक सुशील हरंगुळे अश्विन मोगरकर, विकास हालगे, योगेश पांडकर,नरेशभाई पिंपळे, नितीनजी समशेट्टे ठोंबरे ताई कुरील ताई या वैद्यनाथ विद्यालय शिक्षक राजेश साखरे पापा देशमुख तांदळे सर सचिन मुंडे सर कार्यक्रम चे प्रास्ताविक सुनील देशमुख सर यांनी केले आभार रोडे सर यांनी केले वेळी या वेळी गाव भागातील नागरीक व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवसैनिकांना चोप देण्याची भाषा शिकवू नये

## नांदेड जिल्हा शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पदाधिकाऱ्यांचे बंडू खेडकरांना आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.२८ जुलै -**

पक्षात निष्क्रिय असल्यामुळे बंडू खेडकर यांची हकालपट्टी करण्यात आली असून, याचा थयथयाट करत पक्षातील पदाधिकाऱ्यांना चोप देण्याची भाषा बंडू खेडकर करत असून, परंतु चोप देण्याची भाषा बंडू खेडकरने शिवसैनिकांना शिकवू नये, चोप कसा असतो ते दाखवुन देवू असे आव्हान शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील यांनी दिले.



मागील आठवड्यात शहरातील विश्रामगृहावर झालेल्या प्रकाराचा खुलासा करण्यासाठी नांदेड जिल्हा शिवसेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या पत्रकार परिषदेस जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, जिल्हाप्रमुख बबन बारसे, उपजिल्हाप्रमुख राम चव्हाण, सुनील पाटील, मनोज यादव, नंदू पाटील वैद्य आदीसह शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

मागील आठवड्यात शासकीय विश्रामगृहात शिवसेना नेते संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांना मारहाण झाल्याची चर्चा करण्यात आली. परंतु त्यावेळी केवळ शाब्दीक वाद झाला. प्रसिध्दी माध्यमामध्ये प्रसिध्द होण्यासाठी बंडू खेडकर यांनी चोप दिल्याची खोटी माहिती दिली. तसेच शिवसेनेत पद वाटपासाठी पैसे घेण्यात येत असल्याचा आरोप बंडू खेडकर यांनी केला. जिल्हाप्रमुख पदावरुन हकालपट्टी झाल्यामुळे बंडू खेडकर हे बिनबुडाचे आरोप करीत आहेत. जिल्हा कार्यकारिणी निवडीच्या अगोदर पक्षातील नेत्यांनी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी जिल्हाप्रमुखांना जिल्ह्याचा आढावा, चाचपणी करुन यादी सादर करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील यादी पाठविण्यात आली आणि ती यादी मातोश्रीवरुन जाहीर करण्यात आली. त्यामुळे या कार्यकारिणी निवडीमध्ये पैश्याचा कुठलाही व्यवहार झाला नाही. निष्क्रिय असल्यामुळेच बंडू खेडकर यांची जिल्हाप्रमुख पदावरुन हकालपट्टी करण्यात आली. पदासाठी पैसे मागितल्याचा आरोप करण्यात येत आहे, परंतु ज्यावेळी पैसे मागितले त्यावेळी बंडू खेडकर का बोलले नाहीत, असा प्रश्न उपस्थित करत ज्या पक्षाच्या जीवावर विरोधी पक्षनेता, जिल्हाप्रमुख आदीसह अनेक पदे भोगली त्याच पक्षाने पदावरुन काढल्यानंतर बंडू खेडकर बिनबुडाचे आरोप करत वाद निर्माण करत आहेत. संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांना चोप देण्याची भाषा करत असून, बंडू खेडकर यांनी चोप देण्याची भाषा शिवसैनिकांना शिकवू नये, हिंमत असेल तर दिवस आणि वेळ ठरवावा, शिवसैनिक त्यावेळी हजर राहतील, असे आवाहन जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, जिल्हाप्रमुख बबन बारसे यांनी केले.

# श्रावण महिन्यात भक्तिभावाचा महापूर; नरसी ते राहेर कावड यात्रेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि.२८ जुलै -**

श्रावण मासाच्या पावन पर्वावर, तालुक्यातील नरसी परिसर पुन्हा एकदा हर हर महादेव च्या जयघोषात दुमदुमणार आहे. श्री सिद्धेश्वर मंदिर समितीच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही भक्तिमय यात्रा बुधवार, दिनांक ६ ऑगस्ट रोजी दुपारी ३:०० वाजता श्री क्षेत्र राहेर येथील नृसिंह मंदिरापासून सुरू होईल आणि नरसी येथील श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात समारोप होईल. या यात्रेत भाविक पवित्र गोदावरी जल कावडीत भरून महादेवाच्या पिंडीवर अर्पण करतील. २४ कि.मी.च्या या यात्रेचे तीन टप्प्यांत आयोजन असून दर ८ किमी अंतरावर विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे. कावड यात्रेतील सहभागासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून शुल्क छ५० इतका आहे. यात्रेतील शिस्त जपण्यासाठी काही नियम पाळावे लागणार आहेत: सुरुवातीला महिलांचा आणि त्यानंतर पुरुषांचा सहभाग असेल.

कावडधारकांनी दोन रांगेत चालणे आवश्यक आहे. पहाटे श्री सिद्धेश्वर मंदिर, नरसी येथे उपस्थित राहणे बंधनकारक आहे.केवळ नोंदणी केलेल्यांनाच वाहन प्रवासाची परवानगी दिली जाईल. कावड यात्रा ही केवळ धार्मिक परंपरा नसून, श्रद्धा, सामाजिक ऐक्य आणि भक्तीचा उत्सव आहे. आयोजक समितीने सर्व भाविकांनी वेळेत नोंदणी करून, ज्यास्ती ज्यास्त भाविक भक्तांनी या कावड यात्रेत सहभाग घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### अथक मेहनत आणि अटळ जिद्दीसह वैष्णवी गिरीची नीट परीक्षेत चमकदार कामगिरी

**नांदेड-** राष्ट्रीय स्तरावरील कबड्डीपटू आणि नीट परीक्षेची उमेदवार वैष्णवी गिरी ही अपयशांना तोंड देऊनही दृढनिश्चय आणि कुटुंब्याच्या पाठिंब्यासह यशस्वी होता येते याचे उदाहरण आहे. वैष्णवीने इयत्ता अकरावीपासून नीटची तयारी सुरू केली.



व्यवसायाने ड्रायव्हर असलेले तिचे वडील मर्यादित उत्पन्न असूनही तिच्या कोचिंगचा खर्च भागवण्यासाठी कठोर परिश्रम करत होते. पहिला प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर देखील तिचे वडिल तिला पुन्हा प्रयत्न करण्यासाठी पाठिंबा देत राहिले आणि प्रेरित करत राहिले. दुसऱ्या प्रयत्नात तिने चांगले गुण मिळवले, पण तरीही कट-ऑफपर्यंत पोहोचू शकली नाही. तिच्या वडिलांनी तिला पुन्हा एकदा प्रोत्साहन दिले आणि तिच्या आईसह नांदेडला पाठवले, जेणेकरून ती तिच्या तयारीवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकेल. तेथे तिने फिजिक्सवाला विद्यापीठात यकीन बॅचमध्ये प्रवेश घेतला. तिचे दैनंदिन वेळापत्रक अत्यंत नियोजनबद्ध होते, ज्यामध्ये सकाळपासून संध्याकाळपर्यंत वर्ग, शंकानिरसन आणि स्व-अभ्यास यांचा समावेश होता. शिक्षकांनी तिच्या शंकांचे निरसन करण्यासोबत तिच्या अभ्यास पद्धती सुधारण्यास आणि चुका पुन्हा टाळण्यास मदत केली. नियमित दिनचर्या आणि आधार देणारे वातावरण यामुळे तिला अभ्यासावर लक्ष केंद्रित करता आले. अंतिम परीक्षेच्या अगदी आधी तिच्या वडिलांचा अपघात झाला. यामुळे वैष्णवीला घरी परतावे लागले. त्या कठीण परिस्थितीतही तिचे पालक खंबीरपणे तिच्यामागे उभे राहिले आणि तिने तिचे अभ्यासावरील लक्ष कमी होऊ दिले नाही. त्यांच्या त्यागामुळे तिला पुढे जाण्यास ताकद मिळाली. भौतिकशास्त्र हा तिच्यासाठी सर्वात कठीण विषय होता. सुरुवातीपासूनच तिच्यासाठी हा विषय कमकुवत होता. पण तिने हार न मानण्याचा निर्णय घेतला. नियमित सराव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि वेळेवर समस्येचे निराकरण यांसह तिने या विषयात सुधारणा केली आणि तिचा आत्मविश्वास वाढला.

दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रयत्नाची तयारी करणाऱ्या इतर नीट उमेदवारांना वैष्णवी महत्त्वाचा संदेश देत आहे.

### तलाव फुटल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान: भरपाई देण्याची मागणी



**मुदखेड-** गेल्या आठवड्या भरापासून मुदखेड शहर व परिसरात कमी अधिक प्रमाणात पाऊस सुरू असून या पावसामुळे पिंपळकौठा मगरे तालुका मुदखेड येथील तलाव फुटल्याने शेतकऱ्यांच्या उभ्या पिकाचे नुकसान झाले असून शासनाकडून पिकांची नुकसान भरपाई मिळावी यासाठी शेतकऱ्यांनी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना निवेदन दिले आहे. मुदखेड तालुक्यात कमी अधिक प्रमाणात गेल्या आठवड्या भरापासून पावसाने जोर धरला आहे नदी नाल्यांना पूर येत असून या पुराच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे दरवर्षी प्रचंड प्रमाणात नुकसान होते या पावसामुळे पिंपळकौठा (मगरे) येथील तलाव फुटल्याने तलावाचे पाणी शेजारी असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात शिरल्याने शेतकऱ्यांचे उभे पीक पाण्यात गेले आहे यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे यात केळी तुर कापूस सोयाबीन आधी पिकांचे नुकसान झाले आहे भागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्याकडे नुकसान भरपाई मिळावी म्हणून निवेदन देण्यात आले आहे. यावेळी निवेदनकर्ते भाजपा तालुका सरचिटणीस सचिन मगरे, माजी नगरसेवक संजय आऊलवार, मुन्ना चौधरी,केशव पवार, सदाशिव अंजनवार, माधव पवार, गोविंद एलसटवाड,माधव दासरवाड, बळीराम दासरवाड, भगवान हेमके, शिवाजी उत्तम हेमके, मारुती काळेवार,सुलोचना हेमके, बळीराम हेमके,मारोती मादिलवाड, मारोतराव जाधव, श्रीराम हेमके, प्रकाश हेमके, बालाजी मादीलवाड, व्यंकटी मादीलवाड या शेतकऱ्यांनी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्याकडे निवेदनाद्वारे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

### बॅक ऑफ इंडिया शाखा अधिकाऱ्यांची ऑनलाईन ग्राहक सेवा केंद्रास भेट



**लोहा-** राष्ट्रीय महामार्गा ३६१ वरील बॅक ऑफ इंडिया शाखेच्या सुधीर महाबळे यांच्या ऑनलाईन ग्राहक सेवा केंद्रास बँकेचे शाखा अधिकारी अण्णाराव राठोड व शैलेश गायकवाड यांनी धावती भेट देऊन केंद्राचा आढावा घेतला आणि समाधान व्यक्त केले. तसेच केंद्र चालक सुधीर महाबळे यांनी ग्राहाकाच्या अडचणी सोडवून बँकेबदल विस्वाश निर्माण करत असलेल्या कामाबद्दल प्रशंसा केली. यावेळी पत्रकार सुरेश महाबळे, सचिन गुंडाळे, श्रीहरी चव्हाण, शिवा वसमतकर, अर्जुन महाबळे, अजय बलखंडे आदींसह बॉंकेच्या ग्राहकांची उपस्थिती होती.

# तीर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी; रत्नेश्वरी पालखीचे समितीच्या वतीने स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि.२८ जुलै -**

नांदेड तालुक्यातील पंचक्रोशीतील व शहरालगत असलेल्या जागृत व हजारो भाविक भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या तिर्थक्षेत्र काळेश्वर विष्णूपुरी येथे श्रावण मासातील पहिल्या सोमवारा निमित्ताने भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहून तीर्थक्षेत्र काळेश्वर देवस्थानचे दर्शन घेतले. माता रत्नेश्वरी येथून आलेल्या पालखीचे विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालयाचे सरपंच सौ. संध्या विलासराव हंबर्डे व काळेश्वर विश्वस्त समितीच्या वतीने स्वागत करून दर्शन घेण्यात आले.

विष्णुपुरी येथील तीर्थक्षेत्र काळेश्वर येथे श्रावण मासातील पहिल्या सोमवारा निमित्ताने भाविक भक्तांनी मोठया प्रमाणात गर्दी केली होती, पुजारी गणेश अप्पा महाराज धनमणे यांच्या उपस्थितीत विधीवत पुजन व आरती नंतर दर्शनासाठी भाविक भक्तांना सोडण्यात आले. सकाळपासून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी तिर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात विधीवत पुजन करून दर्शन घेतले, यावेळी विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालयाचे सरपंच सौ. संध्या विलासराव हंबर्डे व विश्वस्त समिती यांच्या वतीने माता रत्नेश्वरी येथून येणारी पालखी चे दरवर्षीप्रमाणे काळेश्वर मंदिर देवस्थानच्या ठिकाणी स्वागत करून दर्शन घेण्यात आले. पालखीच्या स्वागतासाठी दत्त मंदिर भजनी मंडळ विष्णुपुरी यांनी आपल्या गोड वाणीतून गायन करून पालखीचे स्वागत करण्यात आले.यावेळी विश्वस्त समितीचे सचिव



शंकरराव हंबर्डे, बालाजी हंबर्डे, धारोजी हंबर्डे, नारायणराव हंबर्डे, बाबुराव हंबर्डे, शिवाजीराव हंबर्डे, नारायणराव हंबर्डे, विश्वनाथ हंबर्डे, साहेबराव हंबर्डे, सेवानिवृत्त पोउनि. माणिकराव हंबर्डे, बालाजी निळेकर, आप्पाराव कल्याणकर, आनंदराव हंबर्डे, लक्ष्मण ठाकूर, रामचंद्र शेंबोले, सोम भारती महाराज, श्याम हंबर्डे, बाबुराव हंबर्डे, माणिक हंबर्डे, पांडुरंग सूर्यवंशी, चिंतामणी हंबर्डे, बापूराव हंबर्डे, भगवानराव हंबर्डे यांच्यासह भाविक भक्तांची उपस्थिती होती. श्रावण सोमवारी होणारी भाविक भक्तांची गर्दी पाहता ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी १४, पोलीस अमलंदार पुरुष ६१, महिला पोलीस २६ व होमगार्ड पुरूष ३३, महिला १६ यांच्यासह आरसीपी पथक १ आसा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मंदीर परिसरात भाविक भक्तांसाठी बेल फुळ,फुलाचे , मुर्ती दुकाने व खेळणी साहित्य मोठ्या प्रमाणात विक्री साठी आली होती.

# जय दुर्गा महिला कावड मंडळाच्या शेकडों कावरियांची कावड यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि.२८ जुलै -**

शहरातील जय दुर्गा महिला कावड मंडळ च्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही पवित्र श्रावण महिन्यातील भव्य कावड यात्रेचे आयोजन मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाने करण्यात आले. यावेळी शहरातील शेकडो महिला कावरियांकडून श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी वाजंत्र्यांच्या व टाळ मृदंगाच्या तालावर जय भोलेनाथच्या नामाचे भजन गात ,वाजतगाजत कावड यात्रा काढण्यात आली. ही यात्रा भगवान शंकराला समर्पित असून, भक्तगणांनी पैनगंगा नदीतून आणलेले पवित्र जल शंकराच्या मंदिरामध्ये मोठ्या भक्तिभावाने अर्पण करण्यात आले.



आज प्रथम श्रावण सोमवारी सकाळी ०९ वाजता सर्वप्रथम स्थानिक श्री काशी विश्वेश्वर सांब सदाशिव मंदिर येथून महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करुन निघालेली शेकडों महिला कावरियांची ही कावड यात्रा खोरीतील श्री जमदग्नी ऋषि मंदिर येथील महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक केल्यानंतर संपन्न झाली.यावेळी नमः पार्वती पतये हर हर महादेव! अशा भोलेनाथाच्या नामस्मरण गर्जनेने देवभूमी श्री क्षेत्र माहूरगडचा संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

आज, २८ जुलै रोजी श्रावण महिन्याचा पहिला सोमवारी माहूर शहरातही जय दुर्गा महिला कावड मंडळाने देखील श्रावण सोमवारी दरवर्षी कावड यात्रा काढण्याची ही परंपरा कायम ठेवली आहे.

यावेळी महिलांनी पैनगंगेच्या तीरावरून जल भरून आणत हे जल कावड म्हणजे दोन बाजूला हँडल असलेल्या वाद्यावर ठेवलेली पाण्याची धातुची कळस भांडी मध्ये भरून, भक्तजन महिला आपल्या खांद्यावर घेऊन पायी चालत आपल्या स्थानिक शिवमंदिर श्री काशी विश्वेश्वर सांब सदाशिव मंदिरांमध्ये पोहोचवत ते जल शंकराला अर्पण करण्यात आले.या यात्रेमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांना 'कांवरिया' म्हणतात. तेथून ही कावड यात्रा वाजत गाजत भजन करत खोरीतील श्री जमदग्नी ऋषि मंदिर येथे पोहचली तेथे शंकराच्या पिंडीवर जलाभिषेक केल्यानंतर या यात्रेची सांगता झाली.

# कुरेशी समाजाच्या प्रश्नाबाबत तहसील कार्यालयावर मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि.२८ जुलै -**

महाराष्ट्र कुरेशी कॉन्फरन्स समिती, हदगावच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात अवगत करण्यात आले की , कुरेशी समाजावर सतत अन्याय होत आहे व कुरेशी समजाच्या अडी अडचणी कोणीही शासन दरबारी दखल घेत नाही व त्यामुळे कुरेशी समाजाचे संविधानिक हक्क व अधिकार धोक्यात आलेले आहे. शासनाचे कुरेशी समाजाकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले ते न करता कुरेशी समाजाचे समस्या जाणुन घ्यावे व त्यांचे अन्न व उपजिविकेसाठी योग्य तो निर्णय घ्यावा त्याचे अडीअडचणी समजुन घ्यावे त्याचे निवारण करावे असे निवेदनाद्वारे प्रशासनास कळविण्यात आले. यावेळी पाठिंबा म्हणून भीम टायगर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब शेळके, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष हिदायत पठाण, सामाजिक कार्यकर्ते जाकीर चाऊस, शिवसेनेची कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शामराव चव्हाण यांच्यासह कुरेशी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुक्यातील कुरेशी समाज यांचा वडीलोपार्जीत जनावरे खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत आहे व शेती व्यवसाय करीत आहे. स्वतःची व कुटुंबीयांची उपजिवीका भागवीत आहे. पण कुरेशी समाज हा शासनाने निबंध घातलेले कोणतेही जनावर खरेदी विक्री कटींग करीत नाही तसेच शासनामार्फत जे जनावरांचे बाजार आहे त्यातुनच सर्व प्रक्रिया करून व्यवसाय करीत आहे. काही गुंड प्रवृत्तीचे लोक आपली पोळी भागविण्याकरीता कुरेशी समाजाला टार्गेट करून व्यवसाय करू देत नाही व खंडणीची मागणी करीत आहे . कुरेशी समाजाचे लोकांचा काहीएक दोष नसतांना खोटे गुन्हे दाखल करून घेण्यास दबाव आणत आहे व त्याचे दबावापोटी पोलीस यंत्रना कसलीही शहानिशा न करता त्यांच्या वर खोटे गुन्हे दाखल करू अशा धमक्या देतात तसेच कुरेशी समाजातील लोकांनी त्यांना झालेल्या मारहाणी बाबत तक्रार पोलीस स्टेशन येथे दिली तर त्याची तक्रारही घेतली जात नाही आमचे संविधानीक हक्क व अधिकार सर्व धोक्यात आलेले आहे.

# करिअर म्हणजे आयुष्याचे ध्येय संजयराव तालखेडकर यांचे करिअर मार्गदर्शनात प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.२८ जुलै -**

करिअर म्हणजे केवळ नोकरी, व्यवसाय आणि पैसा कमावणे नव्हे, तर ते आयुष्याचे एक ध्येय ठरवून त्या दिशेने समर्पित वाटचाल करणे आहे, असे स्पष्ट मत प्रा. संजयराव तालखेडकर यांनी व्यक्त केले. हुतात्मा गोंड राजे शंकर शहा रघुनाथ शहा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करिअर मार्गदर्शन व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी विद्यार्थ्यांसह मोठ्या संख्येने पालकही उपस्थित होते.

प्रा. तालखेडकर यांनी करिअरच्या संकुचित व्याख्येच्या चौकटीबाहेर पडण्याचे आवाहन करताना सांगितले की, केवळ डिग्री मिळवणे, चांगली नोकरी लावणे व पैसा कमावणे इतक्यापुरते करिअर मर्यादित न ठेवता त्याला मूल्याधारित आयुष्याच्या उद्दिष्टाशी जोडले पाहिजे.

प्रारंभीच त्यांनी आपल्या भाषणात मुलांच्या शिक्षणाबरोबरच संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. वयाच्या १५१६ वर्षांपर्यंत मुलांना पालकांनी आपल्या छत्रछायेखाली ठेवणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच दिल्यास त्यांच्या वैचारिक व बौद्धिक विकासाला हातभार लागतो, असे ते म्हणाले. फक्त चांगले शिक्षण असून चालत नाही तर चारित्र्य, संयम आणि सामाजिक जाणीवही तेवढीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. आज अनेक मुलांना व्यसनाधीनता, कौटुंबिक कलह, घटस्फोट यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, यामागे संस्कारांचा अभाव हे मुख्य कारण आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रा. तालखेडकर यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीबाबत चिंता व्यक्त करत सांगितले की, तीशीनंतर अनेकांना गंभीर आजारांना सामोरे जावे लागत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे व्यायामाचा अभाव. म्हणून विद्यार्थ्यांनी शारीरिक स्वास्थ्याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

स्पर्धा परीक्षांचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, इच्छुक विद्यार्थ्यांनी आठवीपासूनच यासाठी तयारी सुरू करावी. रोज दोनतीन वर्तमानपत्रातील महत्त्वाचे लेख वाचावेत, संसद व विधानपरिषदेमधील चर्चा पाहाव्यात, तसेच देशाच्या व राज्याच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करावा, अशी सल्ला त्यांनी दिला. रेल्वे, बँकिंग, पोस्ट, विमा (इन्शुरन्स) अशा केंद्र शासनाच्या स्पर्धा परीक्षा या वेळापत्रक निश्चित असलेल्या असतात, त्यामुळे अशाच परीक्षांवर लक्ष केंद्रित करावे. मात्र, केवळ ३ प्रयत्न देऊन प्लॅन बी तयार ठेवावा, म्हणजे जर स्पर्धा परीक्षांमध्ये यश न मिळाल्यास दुसरा पर्याय उपलब्ध असेल, असे त्यांनी मार्गदर्शन केले. केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर सामाजिक जाणिवा विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना स्थानिक सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी करून घ्या. यामुळे त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते, असा सल्लाही त्यांनी पालकांना दिला. सदर कार्यक्रमास ३०० ते ४०० विद्यार्थी व पालक मोठ्या उत्साहाने उपस्थित होते. महिलांचा सहभाग देखील लक्षणीय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हु. गोंडराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकरराव अमिलकंठवार हे होते.

सूत्रसंचालन प्रा. सुहास कुलकर्णी (सचिव प्रतिष्ठान) यांनी केले, तर आभारप्रदर्शन गजानन कोत्तावार (कोषाध्यक्ष प्रतिष्ठान) यांनी केले. कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये करिअरबाबत जागरूकता निर्माण केली असून, पालकांनीही या मार्गदर्शनाचा सकारात्मक अनुभव घेतला.

# जिल्हा रुग्णालयास ५०० खाटांची श्रेणीवर्धन मान्यता : खा. डॉ. गोपछडे यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.२८ जुलै -**

नांदेड शहरात असलेल्या गुरुगोविंद सिंगजी शासकीय मेमोरियल जिल्हा रुग्णालयातील खाटांची संख्या वाढवण्यासाठी राज्य शासनाने मंजुरी दिली असून या ठिकाणी असलेल्या ३०० खाटांच्या क्षमतेवरून आता ५०० क्षमतेपर्यंत मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने आरोग्य सेवा विभागाच्या सहसंचालिका डॉक्टर सुनिता गोल्हाईत यांनी लेखी पत्र काढून संबंधित विभागाला कळवले आहे. यासाठी खा.डॉ. अजित गोपछडे यांनी राज्य सरकारकडे आणि केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. आता श्रेणीवर्धन झाली असली तरी या ठिकाणी सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व्हावे यासाठी ही खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांच्याकडे भेट घेऊन मागणी केली आहे.

नांदेड ही गुरुगोविंद सिंघ यांच्या पावन स्मृतीने पुनीत झालेली भूमी आहे. येथे असलेला गुरुद्वारा हा तक्त सचखंड श्री हुजूर साहेब सिख धर्मातील पाच प्रमुख तख्तापैकी एक असून या ठिकाणी देश विदेशातून लाखो श्रद्धाळू मोठ्या प्रमाणात येत असतात. दळणवळणाच्या साधनाने आज नांदेडला मोठ्या प्रमाणात जोडले गेले आहे. रेल्वे, रस्ता, हवाई मार्गाने येथे येणाऱ्या अध्यात्मिक धार्मिक पर्यटकांची संख्या लक्षणीय आहे. शिवाय नांदेड शहर आणि जिल्ह्याची लोकसंख्या प्रचंड वाढते आहे. ही बाब लक्षात घेता सध्याचे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय विष्णुपुरी हे शहरापासून आठ ते नऊ किलोमीटर दूर अंतरावर असल्यामुळे आपत्कालीन आरोग्य सेवा वेळेत मिळत नाही. परिणामी यात्रेकरू नागरिक आणि



ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या गंभीर अडचणीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नांदेड शहराच्या मध्यवर्ती भागात रेल्वे स्थानक आणि तख्त सचखंड श्री हुजूर साहेब गुरुद्वाराच्या जवळ असलेल्या जुन्या सरकारी रुग्णालयाच्या जागेवर ५०० खाटांचे श्री गुरुगोविंद सिंघ जी स्मृती सरकारी रुग्णालय उभारण्यासाठी केंद्र सरकारने विशेष पुढाकार घ्यावा. यासाठी ५० टक्के निधीचा हिस्सा केंद्र सरकारने द्यावा आणि उर्वरित निधीसाठी राज्य सरकारला आदेशित करावे अशी मागणी करत कॅन्सर , ट्रॉमा सेंटर , किडनी, लिव्हर, हृदय असे विविध मानवी अवयवांचे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याच्या अद्ययावत सुविधाही या सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करून द्याव्यात . याच ठिकाणी सिटी स्कॅन , एम आर आय , आय सी यू , अतिदक्षता विभाग आदी महत्वाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. जुन्या ३०० खाटांच्या रुग्णालयाचे ५०० खाटांच्या रुग्णालयात परिवर्तन करून या मध्यवर्ती ठिकाणी बहुमजली आणि अत्याधुनिक सुविधांसह रुग्णालयाची इमारत उभारावी अशी मागणी ही त्यांनी केली होती. राज्य सरकारने ५०० खाटाची श्रेणीवर्धन केली आहे. आता याच ठिकाणी सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात यावे जेणेकरून हे रुग्णालय श्रद्धाळू स्थानिक नागरिक तसेच शेजारच्या जिल्ह्यातील आणि राज्यातून येणाऱ्या यात्रेकरू रुग्णांना एक जीवनदायी आरोग्य सुविधा ठरू शकेल . यासोबतच केंद्र आणि राज्य सरकारने एकत्रितपणे मेडिकल टुरिझमला चालना देणारी समर्पक योजना या ठिकाणी सुरू करावी. नांदेड केवळ श्रद्धेचे नव्हे तर परवडणाऱ्या दर्जेदार आरोग्यसेवेचे आदर्श आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणूनही समोर आले पाहिजे. या ठिकाणी कमी खर्चात आंतरराष्ट्रीय दर्जाची आरोग्य सेवा गरजू रुग्णांना उपलब्ध करून द्याव्यात असा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने आपली सकारात्मक भूमिका घेऊन निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी ही खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केली आहे.दरम्यान यासाठी माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोकराव चव्हाण यांचेही मोलाचे सहकार्य लाभल्याचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी सांगितले